## चिंतलधाबा सौरग्राम प्रकल्पासाठी १ कोटी ५६ लक्ष रुपये मंजूर, आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१ :** राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पोंभूर्णा तालुक्यातील चिंतलधाबा सौरग्राम प्रकल्पासाठी १ कोटी ५६ लक्ष ४० हजार रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. अवघ्या दोन महिन्यांत चिंतलधाबावासीयांना दिलेला शब्द पूर्ण करत आ. मुनगंटीवार यांनी हा महत्त्वपूर्ण निधी मंजूर करून घेतला असून, त्यांच्या पुढाकारामुळे चिंतलधाबा गाव राज्याच्या ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करणारे आदर्श मॉडेल ठरणार आहे.चिंतलधाबा गाव १०० टक्के सौरग्राम म्हणून विकसित करण्यात येणार असून, गावातील प्रत्येक घरावर सौर ऊर्जा पॅनल बसविण्यात येणार आहेत. यासाठी १ कोटी ५६ लक्ष ४० हजार रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी उपलब्ध झाला असून, चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांनी या निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. या निणऱ्यामुळे चिंतलधाबा गाव ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा गाठणार आहे.या निर्णयामुळे ग्रामीण भागात स्वच्छ, शाश्वत आणि किफायतशीर ऊर्जेचा वापर वाढणार असून, गावक?यांना वीजबिलातूनही दिलासा मिळणार आहे.बल्लारपूर विधानसभा क्षेत्र सौर ऊर्जेत राज्यात अग्रस्थानी राहावे, या उद्दिष्टाने आ. सुधीर मुनगंटीवार सातत्याने प्रयत्नशील आहेत. यापूर्वी मुल तालुक्यातील उथळपेठ गाव १०० टक्के सौरग्राम म्हणून विकसित करण्यात आले असून, त्यानंतर आता चिंतलधाबा गावाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. यामुळे बल्लारपूर विधानसभेत ऊर्जा स्वावलंबनाचा आदर्श निर्माण होत आहे.

# केन्द्रीय अर्थसंकल्पावर जिल्ह्यात संमिश्र प्रतिक्रिया

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१ :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या केन्द्रीय अर्थसंकल्पावर जिल्ह्यात विविध स्तरांतून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, उद्योग, स्टार्टअप्स, महिला सक्षमीकरण आणि करसवलतींवर भर देण्यात आला असला तरी शेतकरी व सामान्य नागरिकांसाठी ठोस दिलासा नसल्याची भावना व्यक्त होत आहे.सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी हा अर्थसंकल्प विकासाभिमुख असल्याचे सांगत, देशाला आत्मनिर्भरतेकडे नेणारा अर्थसंकल्प असल्याचा दावा केला. दुसरीकडे विरोधी पक्षांनी हा अर्थसंकल्प निवडणूक डोळ्यासमोर ठेवून सादर करण्यात आल्याचा आरोप करत, शेतकरी, कामगार आणि गरीब वर्गासाठी हा अर्थसंकल्प निराशाजनक असल्याची टीका केली.

एकूणच केन्द्रीय अर्थसंकल्पावर जिल्ह्यात स्वागत आणि नाराजी अशा दोन्ही प्रतिक्रिया उमटल्या असून, आगामी काळात या तरतुदींचा प्रत्यक्ष फायदा कितपत होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विकसित भारताच्या यात्रेला गती देणारा अर्थसंकल्प - आ.किशोर जोरगेवार



केंद्रीय अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या यात्रेला गती देणारा, देशाच्या आकांक्षा आणि नवभारताचा आत्मविश्वास स्पष्टपणे प्रतिबिंबित करणारा असल्याची ठाम प्रतिक्रिया आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली आहे. या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, युवक, कामगार, मध्यमवर्ग तसेच लघु व मध्यम उद्योगांना केंद्रस्थानी ठेवत, देशाच्या आर्थिक बळकटीसाठी दूरदृष्टीपूर्ण आणि निर्णायक पावले उचलण्यात आली आहेत.

हा अर्थसंकल्प आत्मनिर्भर भारत या संकल्पनेला अधिक बळ देणारा असून, देशाच्या सर्वांगीण विकासाचा ठाम रोडमॅप मांडणारा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम, निर्णायक आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली आज भारत केवळ देशांतर्गतच नव्हे, तर जागतिक पातळीवरही आर्थिक, सामरिक आणि राजनैतिक दृष्ट्या भक्कम स्थान मिळवून उभा आहे. जागतिक व्यासपीठावर भारताचा आवाज आता दुर्लक्षित करता येणार नाही, ही वस्तुस्थिती या अर्थसंकल्पातून अधिक ठळकपणे दिसत आहे.

## निवडणुकीसाठी घोषणांची पेरणी ; शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी - खासदार प्रतिभा धानोरकर



आज सादर झालेला अर्थसंकल्प म्हणजे केवळ शब्दांचा सुकाळ आणि आश्वासनांचा पाऊस आहे. प्रत्यक्षात मात्र हा अर्थसंकल्प सामान्यांच्या तोंडाला पानं पुसणारा आणि ठराविक राज्यांवर डोळा ठेवून आखलेला एक 'राजकीय अजेंडा' आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेली 'पेरणी' आहे. हमीभावाचा (श्एइ) मुद्दा अद्याप अधांतरी आहे. खतांच्या किमती वाढल्या आहेत, पण शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळवून देण्याची कोणतीही हमी या अर्थसंकल्पात दिसत नाही, शेतक?यांच्या डोळ्यात पाणी आणणारा अर्थसंकल्प असल्याची टीका खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी केली.

पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू आणि केरळ या राज्यांमध्ये निवडणुका घातल्या आहेत, म्हणूनच अर्थमंत्र्यांनी या राज्यांसाठी तिजोरीचे दरवाजे उघडल्याचे नाटक केले आहे. हा देशाचा अर्थसंकल्प नसून भाजपचा 'निवडणूक जाहीरनामा' वाटत आहे. इतर राज्यांनी काय पाप केले आहे? असा सवाल खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी केला.पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलिंडरच्या किमतींनी सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे. या अर्थसंकल्पातून महागाई कमी करण्यासाठी कोणतीही 'रोडमॅप' दिलेली नाही. प्राप्तिकरात सवलत मिळेल ही मध्यमवर्गीयांची आशा पुन्हा एकदा फोल ठरली आहे. 'सरकारने केवळ आकडेवारीचा खेळ मांडला असून, सामान्यांचा खिसा रिकामाच राहणार आहे. देशातील बेरोजगारीचा दर उच्चांकी असताना, नवीन रोजगार निर्मितीसाठी कोणतीही ठोस तरतूद नाही. स्टार्टअपच्या नावाखाली तरुणांना केवळ स्वप्ने विकली जात आहेत, अशी टीका त्यांनी केली.

## सर्वसामान्यांना न्याय देणारा अर्थसंकल्प : पालकमंत्री डॉ.अशोक उईके



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामनजी यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा सर्वसामान्य जनतेला न्याय देणार आहे. गत १५ वर्षापासून पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात शेतकरी शेतमजूर दलित, आदिवासी, दुर्बल घटक यांच्यासाठी बऱ्याच लोककल्याणकारी योजना व निधीची तरतूद करण्यात येत आहे. त्याचेच प्रतिबिंब आज सादर झालेल्या अर्थसंकल्पात सुद्धा उमटले असून देशातील सर्व जनतेला या अर्थासंकल्पामुळे दिलासा मिळणार आहे.

केंद्र सरकार व राज्य सरकार नेहमीच सामान्य नागरिकांचा विचार करून आर्थिक धोरणे राबवित असल्यामुळे लोकांचे जीवनमान सुकर झाले आहे. आजच्या अर्थसंकल्पातही सामान्य माणसांचे प्रतिबिंब उमटले आहे, अशी प्रातिक्रिया राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉक्टर अशोक उईके यांनी व्यक्त केली.

## विकास सर्वांचा विश्वास सर्वांचा असा हा सर्वसमावेशक अर्थसंकल्प - डॉ.मंगेश गुलवाडे



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा सामान्य माणसाच्या गरजा, मध्यमवर्गाचा दिलासा, शेतकऱ्यांचे सशक्तीकरण आणि तरुणांसाठी संधी निर्माण करणारा आहे. आरोग्यसेवा बळकट करणे, वैद्यकीय सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे आणि आरोग्य खर्चाचा भार कमी करण्यावर दिलेला भर हा जनतेसाठी दिलासादायक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा 'विकास सर्वांचा, विश्वास सर्वांचा' हा मंत्र या अर्थसंकल्पातून स्पष्टपणे दिसतो.'

## मोदी सरकारचा दूरदृष्टीपूर्ण अर्थसंकल्प : माजी अर्थमंत्री आ.सुधीर मुनगंटीवार



केंद्रीय अर्थसंकल्प हा नवभारताच्या आत्मविश्वासाचा, आर्थिक स्थैर्याचा आणि सर्वसमावेशक विकासाचा स्पष्ट आराखडा आहे.'बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो' या राष्ट्रभावनेची ठळक प्रचिती देणारा हा अर्थसंकल्प असून भारताला जागतिक अर्थव्यवस्थेत अग्रस्थानावर नेण्याचा दृढ संकल्प त्यातून दिसून येतो, असे प्रतिपादन राज्याचे माजी अर्थमंत्री आमदार आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी देशाला आर्थिकदृष्ट्या सबळ, सामाजिकदृष्ट्या समतोल आणि जागतिक स्तरावर प्रभावी बनवण्याचा आपला संकल्प पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. केंद्रीय वित्त मंत्री मा. निर्मला सीतारामन यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण, जबाबदार आणि दूरगामी परिणाम करणारा सर्व समावेशक अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.हा अर्थसंकल्प म्हणजे केवळ आकड्यांची मांडणी नसून, भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा आत्मविश्वासपूर्ण संकल्प आहे.मोदी सरकारच्या या विकासाभिमुख वाटचालीला देशवासीयांचा विश्वास आणि पाठिंबा निश्चितच मिळत राहील, असा विश्वास आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

## विकसित भारताच्या पायाभरणीचा आणि सर्वसमावेशक विकासाचा अर्थसंकल्प - हंसराज अहीर



पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वातील सरकारचा नववा केंद्रीय अर्थसंकल्प अर्थमंत्री श्रीमती निर्मला सितारमण यांनी संसदेत सादर केला असून हा अर्थसंकल्प २०४७ मधील विकसित भारताची 'ब्रुयू प्रिंट' असून हा अर्थसंकल्प गरीब, युवाशक्ती, शेतकरी, महिलाशक्ती व मागासवर्गीय घटकांना समर्पित, ऐतिहासिक व देशाच्या विकासाला नव्या उंचीवर नेणारा असल्याचे पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री तथा राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे पुर्व अध्यक्ष हंसराज अहीर यांनी म्हटले आहे.

या अर्थसंकल्पात शेती, उद्योग, स्टार्टअप, शिक्षण, आरोग्य, स्वंयरोजगार व रोजगारासह अन्य महत्वूपर्ण क्षेत्रात पायाभुत सुविधांना दृष्टीपथात ठेवून देशाच्या विकासाला भरीव आर्थिक तरतुदीतून नवी दिशा देण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे.

## सर्वसामान्यांची घोर निराशा - दिनेश दादापाटील चोखारे



केंद्रीय अर्थमंत्री यांनी सादर केलेला २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा सर्वसामान्य नागरिक, मध्यमवर्गीय करदाता आणि शेतकरी वर्गासाठी अत्यंत निराशाजनक ठरला आहे. महागाईने कंबरडे मोडले असताना, सामान्य करदात्यांना दिलासा देण्यासाठी इन्कम टॅक्स स्लॅबमध्ये कोणताही बदल न करणे ही केंद्र सरकारची जनतेप्रती असलेली उदासीनता स्पष्टपणे दाखवते.

पगारदार वर्ग, लघु उद्योजक आणि नोकरदार वर्ग वाढत्या जीवनावश्यक खर्चाशी झगडत असताना सरकारकडून करसवलतींची अपेक्षा होती. मात्र या अर्थसंकल्पात करदात्यांच्या पदरी केवळ निराशाच पडली आहे. 'अच्छे दिन'ची भाषा करणाऱ्या सरकारने प्रत्यक्षात मात्र सर्वसामान्यांच्या खिशावर भार टाकण्याचेच काम केले आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन केव्हाच हवेत विरले असून, या अर्थसंकल्पात त्याचा साधा उल्लेखही ठोस स्वरूपात दिसून येत नाही. खते, बियाणे, कीटकनाशके, डिझेल आणि शेती अवजारांच्या किमती प्रचंड वाढलेल्या असताना बळीराजा हतबल झाला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांसाठी नव्या योजनांची घोषणा करण्याऐवजी जुन्याच योजनांना नव्या नावाने सादर करून सरकारने केवळ दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे.ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी, शेतीमालाला हमीभाव देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ठोस निर्णय अपेक्षित होते.

## भाजपच्या वतीने केंद्रीय अर्थसंकल्पाचे थेट प्रक्षेपण कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न



युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१ :** भारत सरकारचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू असून या अधिवेशनात केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी लोकसभेमध्ये सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे थेट प्रक्षेपण सर्वसामान्य नागरिकांना प्रत्यक्ष पाहता यावे, या उद्देशाने भारतीय जनता पार्टी, जिल्हा चंद्रपूर यांच्या वतीने गांधी चौक, चंद्रपूर येथे सार्वजनिक थेट प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीरित्या, शांततापूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

सदर कार्यक्रमासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिका पार्किंग मैदान हे स्थळ वापरण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनात सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले असून स्वच्छता, वाहतूक व्यवस्था तसेच कायदा व सुव्यवस्था याबाबत आयोजकांच्या वतीने आवश्यक ती दक्षता घेण्यात आली होती.हा संपूर्ण कार्यक्रम महाराष्ट्राचे लोकनेते तथा माजी मंत्री डॉ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टी जिल्हा चंद्रपूरचे अध्यक्ष हरीश शर्मा, महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे, ब्रिजभूषण पाझारे, नगरसेवक राहुल पावडे, सौ. सुनीता जयस्वाल, रवी लोणकर, राम लखीया प्रकाश धारणे, बल्लारपूर शहर भाजप अध्यक्ष एडवोकेट रणजयसिंग मंडळ अध्यक्ष श्रीनिवास जंगमवार, बी.बी.सिंग चंद्रकला सोयाम मनीषा महातव यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच चंद्रपूर शहरातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.केंद्रीय अर्थसंकल्पाच्या थेट प्रक्षेपणामुळे सामान्य नागरिकांना देशाच्या आर्थिक धोरणांची, विकासाच्या दिशेची आणि केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती प्रत्यक्षपणे मिळाल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

## चंद्रपूरच्या चिमुकलीचा 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये गौरव

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी



**चंद्रपूर दि.१ :** आपल्या अफाट बुद्धिमत्तेच्या जोरावर चंद्रपूर येथील अवघ्या १ वर्षे ८ महिने वयाच्या अश्रिता भूषण हजारे हिने 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' (IBR) मध्ये आपले नाव सुवर्ण अक्षरात कोरले आहे. इतक्या लहान वयात तिने दाखवलेल्या विलक्षण स्मरणशक्तीमुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.अश्रिताने तिच्या वयाला न शोभणारी असामान्य कामगिरी करत खालील गोष्टींची यशस्वीरीत्या ओळख व सादरीकरण केले.अश्रिताचा जन्म १७ एप्रिल २०२४ रोजी झाला असून, तिने ३ जानेवारी २०२६ रोजी हे सर्व निकष यशस्वीपणे पूर्ण केले. तिच्या या यशाची दखल घेत 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'ने तिला 'IBR Achiever' या किताबाने सन्मानित केले आहे. तिला नुकतेच अधिकृत प्रमाणपत्र, सुवर्णपदक आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.अश्रिताच्या या यशाबद्दल बोलताना तिचे वडील भूषण हजारे आणि कुटुंबीयांनी आनंद व्यक्त केला. 'लहानपणापासूनच तिची ग्रहणशक्ती उत्तम आहे, तिच्या या कौशल्याला योग्य प्रोत्साहन मिळाल्याने आज राष्ट्रीय स्तरावर तिची ओळख निर्माण झाली,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.चंद्रपूरच्या या 'लिटल चॅम्पियन'च्या कामगिरीमुळे शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बौद्ध समाजातील संस्थांना पायाभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी अनुदान

युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१ :** राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा जास्त बौध्द समाजातील विश्वस्त/सदस्यांची संख्या असलेल्या बौध्द समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणा?या संस्थांना पायाभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी १० लाखांपर्यंत अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत पात्र संस्थाकडून २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने शासनास प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक ६ मार्च २०२६ आहे, असे प्र. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी सुभाष कुमरे यांनी कळविले आहे.

## युवकांनी पंचमहाभूतांचा आदर्श घेत पर्यावरणवादी व्हावे - डॉ.प्रशांत ठाकरे



युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१ :** पृथ्वी, आप (जल) , तेज (अग्नी), वायू , आकाश पंचमहाभूते ही भारतीय दर्शनातील मूलभूत संकल्पना आहेत. ही पाच तत्त्वे भौतिक सृष्टीच्या उत्पत्तीचे आधार मानली जातात याचा समतोल साधून जीव व संपूर्ण सृष्टीची निर्मिती झाली आहे. त्याचा आदर्श घेत युवकांनी समतोल राखत पर्यावरणचे रक्षण करावे पर्यावरणवादी व्हावे असे प्रतिपादन चिंतामणी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद अध्यासन केंद्र गोडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि चिंतामणी ग्रुप इन्स्टिट्यूशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवक आणि पर्यावरण भविष्यासाठी नेतृत्व' या विषयावर व्याख्यानमाला (दि.३१ जानेवारी) शनिवारी स्व. वसंतराव दोंतुलवार ह्यांच्या पुण्यतिथी निमित आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रशांत ठाकरे यांनी व्यक्त केले. त्यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष व्यवस्थापन परिषद सदस्य, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली प्राचार्य प्रशांत दोंतुलवार अध्यासनाचे समन्वयक डॉ. अपर्णा भाके, सहसमन्वयक डॉ. अनंता गावंडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजीव वेगीनवार, डॉ. मधुकर नक्षीने , विकास सोनटक्के आणि सिनेट सदस्य डॉ. सुधीर हुंगे उपस्थित होते.

पर्यावरणवादी होण्या बरोबरच युवकांनी स्वामी विवेकानंदाचा आदर्श जेऊन त्यांच्या विचार अंगिकारावे असे सखोल विचार डॉ. ठाकरे व्यक्त केले. त्यांनी विचारातील युवकांचे महत्त्वावर , ज्यात पंचमहाभूत ते पर्यावरण संरक्षणाशी जोडले. त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि विवेकानंद अध्यासन केंद्राचे प्रस्तावक प्रशांत दोंतुलवार यांनी स्वामी विवेकानंदांचे विचार युवकांसाठी किती प्रेरणादायी आहेत आणि त्यातून भविष्यातील नेतृत्व कसे निर्माण होऊ शकते याची सविस्तर माहिती दिली. प्रास्ताविक डॉ. ओमप्रकाश सोनोने यांनी केले, तर संचालन प्रा. सतीश पिसे यांनी केले. आभार डॉ. धर्मदास घोडेस्वार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान लाभले.

## स्व.डॉ.सच्चिदानंद मुनगंटीवार जयंतीनिमित्त बल्लारपूरमध्ये भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन



युवराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१ :** जिल्ह्यात खेळाडूंसाठी उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक क्रीडा सुविधांमुळे युवकांना योग्य दिशा मिळत असून, क्रीडा क्षेत्राला मोठी चालना मिळत आहे. बल्लारपूर येथे आयोजित स्व. डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार जयंतीनिमित्त बल्लारपूरमध्ये भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजनामुळे कबड्डी सारख्या देशी खेळांच्या माध्यमातून समाजात संघभावना, सामूहिकता, शिस्त व क्रीडावृत्ती निर्माण होत असून, क्रीडा स्पर्धा हे सामाजिक ऐक्य बळकट करणारे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

हौशी जिल्हा कबड्डी असोसिएशन चंद्रपूर (ग्रामीण/शहर) व आमदार सुधीर मुनगंटीवार फॅन्स क्लब बल्लारपूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार यांच्या जयंतीनिमित्त आमदार चषक अंतर्गत भव्य जिल्हास्तरीय पुरुष व महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दि. २४, २५ व २६ जानेवारी रोजी बल्लारपूर येथील दादाभाई नौरोजी वार्ड, सुषमा स्वराज कौशल्य विकास केंद्र परिसरात पार पडलेल्या या स्पर्धांना खेळाडू व क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पुरुष गटातील २० तर महिला गटातील १० संघांनी सहभाग नोंदवून स्पर्धांना चुरशीचे स्वरूप प्राप्त झाले.

या कार्यक्रमास भाजपा जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा, कबड्डी स्पर्धेचे आयोजक श्रीकांत आंबेकर, समीर केने, निलेश खरबडे, काशीनाथ सिंग, मनीष पांडे, मुन्ना ठाकूर, गोगी दारी, राजू अंचूरी, संजय मोप्पिडवार, प्रकाश दोतपल्ली, राकेश सिंग, ब्रिजभूषण पाझारे, सचिन कुकडे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, जिल्ह्यात खेळाडूंसाठी उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक क्रीडा सुविधांमुळे युवकांना योग्य दिशा मिळत असून, क्रीडा क्षेत्राला मोठी चालना मिळत आहे. ग्रामीण व शहरी भागातील युवकांना दर्जेदार मैदान, प्रशिक्षण व स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध होत असल्याने त्यांच्या क्रीडा कौशल्यांचा विकास होत आहे. क्रीडेमुळे युवकांमध्ये शिस्त, चिकाटी, सांघिक भावना व सकारात्मक स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होत असून, समाजघडणीमध्ये क्रीडा महत्त्वाची भूमिका बजावत आहे.कबड्डी सारख्या देशी खेळांच्या माध्यमातून समाजात संघभावना, सामूहिकता, शिस्त व क्रीडावृत्ती निर्माण होते. क्रीडा हे सामाजिक ऐक्य बळकट करणारे प्रभावी माध्यम असून, अशा स्पर्धांमुळे युवकांना स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळते, तसेच आरोग्यदायी व सुदृढ समाज निर्मितीस चालना मिळते.पुढे ते म्हणाले, महिला सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात येत असून एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या माध्यमातून ६२ अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणारे उपकेंद्र उभे राहत आहे. तसेच स्व. सुषमा स्वराज कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून महिलांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना आत्मनिर्भर करण्याचे कार्य सुरू असल्याचेही आ.मुनगंटीवार यांनी नमूद केले.



**अपघात...**

आदिलाबाद किनवट ढाणकी उमरखेड झाडगाव जवळ ऊसाचा ट्रॅक्टर घासल्याने अपघात घडला. यात जिवीत हानी झाली नाही. सर्व प्रवाशी सुखरुप आहेत. उमरखेड आगाराची उमरखेड-ढाणकी-टेबुरदरा-किनवट आदिलाबाद जाणारी अपघातग्रस्त बस. (युवाराष्ट्र दर्शन : शेख इरफान)

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-

गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-

संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०

* एजन्सीसाठी संपर्क

ई-मेल ssawarkar43@gmail.com

# विकसित भारताच्या दिशेने ठोस पाऊल

## पालकमंत्री संजय राठोड यांची अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया







**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १ फेब्रुवारी**

आज केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेला देशाचा अर्थसंकल्प 2026-27 हा सर्वसमावेशक विकास, पायाभूत सुविधा विस्तार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा दूरदृष्टीचा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्राचे मंत्री संजय राठोड यांनी दिली.

ते म्हणाले की, हा अर्थसंकल्प 'विकसित भारत 2047' या राष्ट्रीय ध्येयाकडे नेणारा स्पष्ट रोडमॅप सादर करतो. रेकॉर्ड भांडवली खर्च, रेल्वे, लॉजिस्टिक्स, जलमार्ग, उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूक यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला नवी गती मिळणार आहे. विशेषतः जलव्यवस्थापन, सिंचन, नैसर्गिक साधनसंपत्ती संवर्धन आणि शाश्वत शेती यावर दिलेला भर अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे ग्रामीण भागातील शेती उत्पादनक्षमता वाढेल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. मृदा व जलसंधारणास पूरक धोरणे भविष्यातील पिढ्यांसाठी संसाधन सुरक्षित ठेवणारी ठरतील.

MSME, सेमीकंडक्टर मिशन, बायोफार्मा, टेक्सटाईल आणि डिजिटल-AI उपक्रम यांमुळे उद्योग व रोजगार निर्मितीला चालना मिळेल. तरुणांसाठी कौशल्यविकास आणि तंत्रज्ञानाधारित संधी वाढविण्यावर सरकारचा स्पष्ट भर दिसतो. कररचनेत स्थिरता राखत मध्यमवर्गाला दिलासा, तसेच पायाभूत सुविधांवरील मोठ्या गुंतवणुकीमुळे देशांतर्गत मागणी आणि विकास दोन्ही मजबूत होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

"हा अर्थसंकल्प केवळ आर्थिक ताळेबंद नसून गरीब, शेतकरी, कामगार आणि तरुणाईच्या आशाआकांक्षांना बळ देणारा विकासाचा आराखडा आहे. माननीय पंतप्रधान आणि वित्तमंत्री यांचे मी अभिनंदन करतो," असेही राठोड यांनी सांगितले.

### निराशजनक बजेट : आ. बाळासाहेब मांगुळकर



आज संसदेमध्ये केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा ग्रामीण भारत तसेच शेतीवर अवलंबून असलेले शेतकरी मजूर यांच्यासाठी निराशाजनक बजेट असे म्हणावे लागेल. यामध्ये महागाई नियंत्रणात आणण्यात सरकार अपयशी ठरले आहे तसेच शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसल्या गेली आहे. खताच्या दरवाढीवर कुठलेच नियंत्रण नाही कृषिप्रधान देश असतांना शेतकऱ्यांसाठी पाहिजे तशी कुठलीच उपाययोजना दिसत नाही. यवतमाळ वर्धा नांदेड रेल्वे प्रकल्पासाठी पाहिजे त्या प्रमाणात काहीच नाही सदर बजेट म्हणजे कोट्यावधी रुपयांचा फुगवलेला फुगा आहे बेरोजगारांना पूर्णत: निराश केले आहे करोडो रुपयांचा आकड्यांचा खेळ आहे शिक्षण आरोग्य यावर तर पाहिजे त्या प्रमाणात काहीच नाही बजेट हे बजेट नसून ते जेट विमानासारखे आहे आले आणि भुरकून उडून गेले सामान्य जनतेसाठी काहीच नाही

**- आमदार बाळासाहेब मांगुळकर**

### जखमेवर मीठ चोळणारा प्रकार - आमदार संजय देरकर



"आज सादर झालेला अर्थसंकल्प पाहता, सरकारने पुन्हा एकदा हे सिद्ध केले आहे की त्यांना सामान्य शेतकरी, कष्टकरी आणि शेतकर्यांच्या प्रश्नांशी काहीही देणंघेणं नाही. हा अर्थसंकल्प केवळ मूठभर भांडवलदार आणि कॉर्पोरेट जगताला खूश करण्यासाठी आखलेला एक 'इव्हेंट' आहे. शेतकऱ्यांची फसवणूक: ज्या बळीराजाच्या जिवावर देश उभा आहे, त्या शेतकऱ्यांच्या हमीभावाबद्दल किंवा कर्जमाफीबद्दल या अर्थसंकल्पात सोयीस्कर मौन पाळले आहे. बियाणे, खते आणि डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे शेतकरी आधीच मेटाकुटीला आला असताना, सरकारने त्याला वाऱ्यावर सोडले आहे.आदिवासी बांधव, कोरडवाहू भागातील कष्टकरी आणि उपेक्षित घटकांसाठी कोणत्याही विशेष तरतुदी या अर्थसंकल्पात दिसत नाहीत. आरोग्यापासून शिक्षणापर्यंतच्या ग्रामीण भागाशी निगडित योजनांकडे केलेले दुर्लक्ष हे अत्यंत गंभीर आहे.

### अपेक्षांचा विश्वासघात

आज सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर



वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष, गटनेते तथा नगरसेवक डॉ.नीरज वाघमारे यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

हा अर्थसंकल्प बहुजन समाज, कष्टकरी, शेतकरी, कामगार,महिला व युवकांच्या मूलभूत प्रश्नांना स्पर्शही न करणारा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महागाई नियंत्रण, रोजगारनिर्मिती, सामाजिक सुरक्षेच्या योजनांबाबत सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला. अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी,अल्पसंख्याक व वंचित घटकांसाठी स्वतंत्र व भरीव तरतुदी नसणे ही गंभीर बाब असल्याचे डॉ.नीरज वाघमारे यांनी सांगितले. शिक्षण,आरोग्य,पोषण आहार व सामाजिक न्यायाच्या योजना कमकुवत केल्याने गरिबांवरील अन्याय अधिकच वाढणार आहे.विदर्भासारख्या मागास भागातील शेती,पाणी व रोजगाराच्या प्रश्नांकडे केंद्र सरकारने पुन्हा एकदा दुर्लक्ष केल्याची टीका त्यांनी केली. हा अर्थसंकल्प कॉर्पोरेटधार्जिणा असून सामान्य जनतेसाठी नसल्याचे स्पष्ट झाले आहे,असे सांगत डॉ.नीरज वाघमारे यांनी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने या अर्थसंकल्पाचा निषेध केला.

## संक्षिप्त

### युवकावर चाकूहल्ला

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ :**

काहीही कारण नसतांना एका युवकावर दोघांकडून चाकू हल्ला करण्यात आल्याची घटना पुसदच्या मोमीनपुरा परिसरात घडली. शेख साहील शेख शौकत (२०) रा. मोमीनपुरा वसंतनगर पुसद, असे या हल्ल्यात जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे. तो ३० जानेवारी रोजी आसीफभाईच्या किरणा दुकानाजवळ असताना हा हल्ला करण्यात आला. शेख साहील शेख सुल्तान (२२) आणि शेख इब्राहीम शेख सुल्तान (३५) दोघेही रा. मोमीनपुरा या दोघांनी संगनमत करुन हल्ला केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी शेख साहील शेख शौकत यांनी वसंतनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरुन दोन हल्लेखोरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आर्णी रोडवरुन दुचाकी लंपास

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ :**

येथील आर्णी रोडवरील एका हॉटेलसमोर उभी ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केली. या प्रकरणी नीरज गजानन मांदेवार (२६) यांनी अवधूतवाडी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. ते मूळचे आर्णीच्या अरविंदनगरातील रहिवासी असून सध्या यवतमाळ येथील समर्थवाडी परिसरात राहतात. २२ जानेवारी रोजी ते आर्णी रोडवरील एका हॉटेलसमोर आपली दुचाकी (एमएच २९ सीजी ४८६९) उभी ठेवून काही कामासाठी गेले होते. दरम्यान अज्ञात चोरट्याने ही ६० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरुन नेली. या प्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### न्यायाधीशांच्या निवासस्थानात चोरीचा प्रयत्न

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ :**

चक्क न्यायाधीशाच्या निवासस्थानात चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला. हा प्रकार पुसद येथे ३१ जानेवारीला उघडकीस आला. पुसद येथील न्यायाधीश राहत असलेल्या इमारतीच्या गेटची कडी उघडून चोरीचा प्रयत्न झाला. तशी फिर्याद पुसद शहर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

# ऑटोतून दारू नेणारा मुद्देमालासह जेरबंद

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पांढरकवडा, दि. १ फेब्रुवारी**



अवैध देशी दारूची वाहतूक करणारा ऑटो पोलिसांनी पकडला. ही कारवाई रविवारी (ता.१) पांढरकवडा पोलीस स्टेशन येथील गुन्हे शोध पथक हे पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलींग करीत असतांना करण्यात आली. एका आरोपीला जेरबंद करण्यात आले असून आरोपीकडून १ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

विठ्ठल लच्छमन्ना बासावार वय 47 वर्षे धंदा- ऑटो चालक मालक रा. वठोली ता. झरी जि. यवतमाळ असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या ऑटोचालकाचे नाव आहे.

ऑटो क्र AP-01TA-0072 पिवळ्या रंगाचा यामध्ये अवैधरीत्या दारू घेवुन पिंपरी गावाकडे कडे जात आहे. अशा खात्रीलायक माहीतीवरून पिवळ्या रंगाचा ऑटोची झडती घेतली असता ऑटोमध्ये मागील बाजुस खाकी रंगाचे खरड्याचे 04 बॉक्स संजीवनी देशी दारुन (संजिवनी डिस्टीलरी) असे प्रत्येक बॉक्स वर लिहीलेले दिसुन आले, सदर बॉक्सची पाहणी केली असता खाकी रंगाचे खरड्याचे प्रत्येक बॉक्स मध्ये 48 नग असे 4 खरड्याचे खाकी रंगाचे खोक्यात एकुण 192 नग देशी दारू बॉबी संत्रा कंपनीचे प्रत्येकी 180 एम. एल. क्षमतेने भरलेले सिलबंद पव्वे प्रत्येकी 80/- रू. प्रमाणे एकुण किं. 15360 रु /- रू. चा मुद्देमाल. तसेच शिटर ऑटो रिक्षा अँपे कंपनी क्र AP-01TA-0072 पिवळ्या रंगाचा किंमत 1,50,000 रु चा असा एकुण 1,65,360 रु चा मुद्देमाल मिळुन आल्यावरुन जप्त करण्यात आला आरोपी कायदेशिर कार्यावाही करण्यात आली आहे.

सदर कार्यावाही ही पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक अशोक थोरात, सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी पांढरकवडा रॉबिन बंन्सल यांचे मार्गदर्शनात तसेच पोलीस निरीक्षक पांढरकवडा एल. डी. तावरे, यांचे सुचनेनुसार गुन्हे शोध पथकातील नितीन सुशिर, विलास जाधव, सचिन काकडे, संदिप मडावी, राजु मुत्यालवार यांनी केली आहे.

# आशा स्वयंसेविकांच्या बेमुदत उपोषणाला पाठिंबा

## न्याय मिळेपर्यंत संघर्षात सोबत राहण्याचा निर्धार

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ,दि.१ फेब्रुवारी**



यवतमाळ जिल्हा परिषदेसमोर विविध प्रलंबित मागण्यांसाठी सुरू असलेल्या आशा स्वयंसेविकांच्या बेमुदत उपोषणाला पाचव्या दिवशीही तीव्र स्वरूप प्राप्त झाले आहे.कोविड काळातील थकीत मानधन,कुष्ठरोग व क्षयरोग निर्मूलन मोहिमेचा मोबदला,तसेच ऑनलाईन कामासाठी आवश्यक ५-जी हॅंडसेट व अमर्याद डेटा प्लॅन या प्रमुख मागण्यांकडे प्रशासनाकडून अद्यापही दुर्लक्ष होत असल्याने आशा सेविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर (शनिवार),दिनांक ३१ जानेवारी रोजी यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या उपस्थितीत शेतकरी चळवळीचे प्रा.पंढरी पाठे यांनी उपोषणकर्त्या आशा स्वयंसेविकांना जाहीर पाठिंबा दिला.यावेळी शेतकरी चळवळ यवतमाळच्या वतीने आशा सेविकांच्या आंदोलनाशी एकजूट व्यक्त करत,"जोपर्यंत आशा स्वयंसेविकांना न्याय मिळत नाही,तोपर्यंत आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू," असा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी बोलताना प्रा. पंढरी पाठे यांनी सांगितले की,"कोविडसारख्या कठीण काळात जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या आशा सेविकांना आजही त्यांच्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे लागणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे.प्रशासनाने त्यांच्या न्याय्य मागण्या तातडीने मान्य केल्या नाहीत,तर आंदोलन अधिक तीव्र केले जाईल." आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी देखील आशा स्वयंसेविकांच्या मागण्यांना पाठिंबा देत प्रशासनाच्या उदासीन भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. आशा सेविकांच्या प्रश्नांबाबत शासनाने संवेदनशीलता दाखवावी व तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा,अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, या आंदोलनस्थळी सोशल मीडिया काँग्रेस कमिटी यवतमाळ जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके, कॉम्रेड सचिन मनवर यांच्यासह मोठ्या संख्येने उपोषणकर्त्या महिला उपस्थित होत्या.प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जिल्ह्यातील वातावरण चिघळण्याची शक्यता निर्माण झाली असून,आशा स्वयंसेविकांच्या आंदोलनाला विविध संघटना व सामाजिक चळवळींकडून वाढता पाठिंबा मिळत आहे.

# तालुका आरोग्य अधिकारी साहेब हा घ्या पुरावा!

## बोगस बंगाली डॉक्टरांची प्रॅक्टिस सुरूच

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी दिग्रस, दि. १ फेब्रुवारी**





तालुक्यातील अनेक गावात बऱ्याच दिवसांपासून बोगस व बंगाली डॉक्टरांच्या हातात ग्रामीण जनतेच्या आरोग्याची नाडी फसलेली असतांना याच बाबी ची 30 जानेवारी रोजी तालुका आरोग्य अधिकारी पवार यांच्याशी दै. युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधीने दूरध्वनी वरून संपर्क साधून कारवाई बाबत विचारणा केली असता पंधरा दिवसापासून तालुक्यातील बोगस व बंगाली डॉक्टर पळून गेल्याचे सांगण्यात आले मात्र काल 31 जानेवारी रोजी सिंगद येथील येथील बंगाली डॉक्टरांचे रुग्ण तपासणे सुरू असतांना जीपीएस मॅप कॅमेरा मध्ये कैद केले असून आरोग्य विभागांचा खरा चेहरा उजेडात आला आहे.

दिग्रस तालुक्यात 15 ते 20 बोगस डॉक्टरांची संख्या असून मागील बरेच महिने पासून आरोग्य विभागाच्या अर्थपूर्ण संबंधातून बोगस डॉक्टरांचा ऊत आला असून आरोग्य विभागावर होणाऱ्या आरोपा विषयी त्यांच्या कार्यप्रणालीवर निश्चितच संशय व्यक्त होणे साहजिकच असणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्र हरसुल येथील भोंगळ कारभार मागील आठ दिवसापूर्वी चव्हाट्यावर आला असतांना व बोगस बंगाली डॉक्टरांचा तालुक्यात जणू काही महापूरच आलेला असताना तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी केलेले वक्तव्य म्हणजे पांघरण झाकण्याचा प्रकार असल्याचे दिसून येत आहे. शासनाचा गलेलठ्ठ पगार घेऊन ग्रामीण जनतेच्या जीवाशी आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जणू खेळत मांडलेला आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन संबंधित दोषीवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे

# स्व. गायत्री काळे फाउंडेशनतर्फे निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## १०६ निबंध प्राप्त; रुपाली धुळे ,सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय यवतमाळ प्रथम

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १ फेब्रुवारी**

स्व. गायत्री काळे फाउंडेशन, यवतमाळ यांच्या वतीने आयोजित "वर्तमान शिक्षणात पालक व युवकांची भूमिका" या विषयावरील निबंध स्पर्धेला सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेस एकूण १०६ निबंध प्राप्त झाले.

ज्येष्ठ पत्रकार पद्माकर मलकापूरे यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ परीक्षक समितीने निबंधांचे मूल्यांकन केले. त्यामध्ये प्रथम क्रमांक – रुपाली मधुकर धुळे सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय यवतमाळ, द्वितीय क्रमांक – सौ. अभिलाषा अभिषेक राजहंस, तृतीय क्रमांक – मनाली संजय खरात तर प्रोत्साहनपर पारितोषिक – गौरी सुरेश गेडाम (ता. नेर) यांनी पटकावले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या पारितोषिक वितरण सोहळ्याच्या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद यादगीरवार हे उपस्थित राहणार असून, प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्या डॉ. सुप्रभा यादगीरवार तसेच प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे उपस्थित राहणार आहेत. यावेळी "जेथे जातो तेथे तू माझा सांगाती" या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यान होणार आहे. स्व. गायत्री काळे फाउंडेशन, यवतमाळ तर्फे "गीत नया गाता हू" या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी अमृत सेलेब्रेशन हॉल, यवतमाळ येथे करण्यात आले असून, या कार्यक्रमांतर्गत सदर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.असे स्व. गायत्री काळे फाउंडेशनचे अध्यक्ष सतीश काळे यांनी कळविले आहे

# कर्जदार कर्ज भरण्यास तयार मात्र 'राजलक्ष्मी'चा नकार

## पीडित संघर्ष समितीने व्यक्त केली खदखद

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १ फेब्रुवारी**



राजलक्ष्मी पतसंस्था ही यवतमाळसह इतरही जिल्ह्यात कार्यरत आहेत. या पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विविध गैरप्रकार करीत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे, असे एक ना अनेक आरोप पीडित संघर्ष समितीच्यावतीने रविवारी (ता.१) स्थानिक एका हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत केला आहे. यावेळी पीडित संघर्ष समितीने पतसंस्थेचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आणला आहे. दरम्यान याबाबत पतसंस्थेच्यावतीने आरोपात कुठलेही तथ्य नसल्याचे म्हटले आहे.

या पत्रकार परिषदेला नरेंद्र लांजेवार, दत्ता गटलेवार, यु. डी. आगरे, विलास मुके, सुदेश राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.राजलक्ष्मी या पतसंस्थेतील शेकडो सभासद तथा कर्जदारांनी पीडित संघर्ष समिती स्थापन केली आहे. यात जवळपास ३०० सभासद आहे. पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी क्षीतीज तायडे हे आहेत. त्यांनी आपल्या पदाचा कारभार १ जून २०१४ रोजी स्वीकारला. परंतु त्यांची नियुक्ती आदेशांना पायदळी तुडवित केली असल्याचे पत्रपरिषदेत सांगण्यात आले. त्याचप्रमाणे कर्जदारांसोबत अरेरावी, दबाव टाकून कर्जवसुली करण्यात येते, याबाबत अवधुतवाडी व शहर पोलिस स्टेशन येथे पतसंस्थेच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संघर्ष समितीमधील ९० ते ९५ टक्के कर्जदार हे कर्ज भरण्यास ईच्छुक असून मात्र क्षितीज तायडे यांची कर्ज भरुन घेण्याची मानसिकताच नाही असा आरोप करण्यात आला.

### पतसंस्थेची नाहक बदनामी : क्षितिज तायडे

थकित कर्जदारांनी केलेले बहुतांश आरोप हे जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांनी केलेल्या सन 2019 च्या तपासणी अहवालाच्या आधारावर आहेत ज्याचे स्पष्टीकरण सात वर्षांपूर्वीच सीआरसीएस न्यू दिल्लीला देण्यात आलेले आहे. थकीत कर्जदारांच्या समितीचे अध्यक्ष नरेंद्र लांजेवार सातत्याने सोशल मीडियाचा वापर करून पतसंस्थेची बदनामी करत आहे या आरोपांमध्ये कुठलेच तथ्य नसल्यामुळे त्यांच्याविरुद्ध पतसंस्थेची बदनामी केल्याच्या कारणावरून पन्नास लाखाची मानहानीची नोटीस देण्यात आली आहे.

**-क्षितिज तायडे,** व्यवस्थापकीय संचालक, राजलक्ष्मी मल्टीस्टेट पतसंस्था, यवतमाळ

# ढाणकी येथे संत रविदास महाराज यांची जयंती

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी: ढाणकी, दि. १ फेब्रुवारी**



मध्ययुगीन भारतातील महान संत ज्यांनी समाजातील अनिष्ट रुढी परंपरांना संपवून समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय प्रस्थापित करण्याचे महान कार्य केले.असे महान संत शिरोमणी गुरुरविदास महाराज यांचा जन्मोत्सव भारत आणि भारताबाहेरही मोठ्या उत्साहात साजरा केल्या जातो. आज दि.1 फेब्रुवारी 2026 रोजी ढाणकी शहरात संत गुरु रविदासजी महाराज यांच्या जयंती निमित्त बामसेफ प्रणित गुरु रविदास क्रांती मोर्चा तथा राष्ट्रिय मुस्लीम मोर्चाद्वारे विविध सामाजिक संघटना यांनी एकत्र येऊन वैचारिक प्रबोधनात्मक अभिवादन केले.

यावेळी "संत गुरु रविदास महाराज यांचा विचार हा मानवतेच्या उद्धाराचा विचार असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपला,'अस्पृश्य मूळचे कोण?' हा ग्रंथ त्यांना अर्पण करून दिल्लीत पहिली जयंती साजरी केली होती." असे विचार भारत मुक्ती मोर्चा चे दिलीप कलाले यांनी व्यक्त केले. तसेच वैचारिक अभिवादन करताना बहुजन मुक्ती पार्टीचे मुनव्वर खान यांनी,"संत रविदास महाराजांची जयंती अठरापगड जाती धर्मातील बांधवांनी एकत्र येऊन वैचारिक प्रबोधनातून साजरी करावी असे मत व्यक्त केले." भारतीय युवा मोर्चाचे अमोल पाटील, राष्ट्रिय मुस्लीम मोर्चा चे शेख जब्बारभाई यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून ज्येष्ठ पत्रकार शेख इरफान भाई,मिलिंद चिकाटे,शाहरूख भाई राष्ट्रीय चर्मकार महासंघ अध्यक्ष, गजानन मारुती सुरोशे व तसेच चर्मकार विकास संघ आकाश डोंगरे, विष्णू सुरोशे, प्रभाकर वाघमारे, दत्ता वाघमारे, संभाजी पडतुडे, नारायण पडतुडे व महिला मंडळ सर्व चर्मकार समाज उपस्थित होते यावेळी संत रविदास महाराज चौक ढाणकी येथील संत रविदास महाराज स्मारक येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून नागरिकांनी मोठ्या उत्साहात अभिवादन करीत जयंती साजरी केली.

(४) युवाराष्ट्र दर्शन

# गोंदिया जिल्हा

सोमवार, २ फेब्रुवारी २०२६

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**

मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६

**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**

जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

## कचारगडच्या विकासासाठी शासन प्रयत्नशील : मंत्री डॉ. अशोक उईके

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**गोंदिया :** कचारगड लाखो आदिवासी भाविकांचे श्रध्दास्थान आहे. अनेक राज्यांमधून दरवर्षी भाविक येथे मोठ्या श्रद्धेने येत असतात. येथे येणाऱ्या भाविकांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यामुळे कचारगडच्या विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी केले.



राष्ट्रीय स्तरावरचा गोंडी समाजाचा सांस्कृतिक उत्सव, महाअधिवेशन तथा कोया पुनेम महापुजा निमित्त सालेकसा तालुक्यातील धनेगाव येथे ३० जानेवारीपासून 'पारी कोपार लिंगो' माँ कली कंकाली पेनठाना देवस्थान कचारगड यात्रा सुरु झाली असून येथील सांस्कृतिक भवन येथे शनिवारी आयोजित कार्यक्रमात श्री. उईके बोलत होते. राज्याचे गृह राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, खासदार डॉ.प्रशांत पडोळे, सर्वश्री आमदार संजय पुराम, डॉ.परिणय फुके, माजी आमदार(गडचिरोली) देवराव होळी, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, धनेगाव ग्रामपंचायत सरपंच सिंधू घरत, जिल्हा परिषद सदस्य सविता पुराम, उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड, प्रकल्प अधिकारी उमेश काशिद यावेळी उपस्थित होते. श्री. उईके म्हणाले, कचारगड ही आदिवासी समाजाची पवित्र भूमी आहे. या ठिकाणी आदिवासी बांधव मोठ्या भक्ती भावाने येतात. आदिवासी ही आपली गौरवशाली संस्कृती आहे. आपल्या संस्कृतीचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे. या ठिकाणी मिळालेल्या आशिर्वादरुपी ऊर्जा, आदिवासी बांधवांच्या विकासासाठी प्रेरणा देणारी असते.जल, जमीन व जंगलाचे संवर्धन आदिवासी समाजाने केले आहे. या समाजाच्या प्राचीन अशा संस्कृतीचे जतन करण्याचा शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. शासकीय आश्रमशाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यात येत आहे. आदिवासी समाजातील सांस्कृतिक वारसा, भाषा, कला आणि परंपरेचे संवर्धन करण्यावर भर देणार आहे. आदिवासींच्या समस्या सोडविण्यावर भर देणार असून कचारगडच्या विकासासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करेन असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. श्री. भोयर म्हणाले, कचारगड हे आदिवासी बांधवांचे पवित्र श्रध्दास्थान आहे. या भागातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन कचारगडच्या विकासासाठी ज्या असुविधा भासत आहेत, त्या सर्व सुविधा आपण शासन स्तरावर पुढाकार घेऊन सोडवू असे त्यांनी यावेळी सांगितले. कचारगड ही यात्रा आत्मिक शांतीकडे घेऊन जाते. आपण आपली संस्कृती विसरु नये. गोंडी भाषेला राष्ट्रीय भाषेचा दर्जा मिळण्यासाठी केंद्र शासन स्तरावर आपण नक्कीच प्रयत्न करु असे खासदार डॉ.प्रशांत पडोळे म्हणाले. कचारगड हे आदिवासी समाजाचे श्रध्दास्थळ असून गोंडी समाजाचे केंद्रबिंदू आहे. कचारगडच्या विकासासाठी शंभर कोटींचा निधी मंजूर करण्यात यावा, गोंडी भाषेला राष्ट्रीय भाषेचा दर्जा मिळावा, या ठिकाणी भाविकांच्या सोईच्या दृष्टीने कायमस्वरुपी भव्य दिव्य असे व्यासपीठाचे निर्माण करण्यात यावे, अशा मागण्या आमदार संजय पुराम यांनी आपल्या भाषणात व्यक्त केल्या. प्रास्ताविक व सुत्रसंचालन भरत मडावी यांनी केले. कार्यक्रमास आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

## महागाई कमी करण्यासाठी कोणतीही ठोस तरतूद नाही : खा. डॉ. नामदेव किरसान

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**



**आमगाव:** केंद्रीय बजेटमधून महागाई कमी होईल व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा असताना सरकारने पुन्हा एकदा जनतेची घोर निराशा केली आहे. पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस, अन्नधान्य तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंचे दर सातत्याने वाढत असताना व डॉलरच्या तुलनेत रुपया दररोज झपाट्याने कमकुवत होत चालल्यामुळे महागाईत भर पडत आहे. मागच्या महिन्यात ९० रुपयाला असलेला डॉलर आता ९२ रुपये झालेला असतांनाही नियंत्रणासाठी कोणतीही ठोस तरतूद या बजेटमध्ये करण्यात आलेली नाही.

देशातील युवक मोठ्या प्रमाणात बेरोजगारीच्या विळख्यात सापडलेले असताना रोजगारनिर्मितीसाठी स्पष्ट व प्रभावी दिशा या बजेटमधून दिसून येत नाही. कंत्राटीकरण व खाजगीकरणाच्या धोरणामुळे कायमस्वरूपी नोकऱ्या नष्ट होत असताना सरकार जाणीवपूर्वक मौन बाळगत असल्याचे चित्र आहे. गडचिरोली जिल्हा हा देशातील अतिदुर्गम व मागास जिल्ह्यांपैकी एक असून, गडचिरोली–चिमूर लोकसभा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी किमान १० हजार कोटी रुपयांचे विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्यात यावे, अशी मागणी यापूर्वी सातत्याने करण्यात आली होती. मात्र या बजेटमध्ये गडचिरोली जिल्ह्यासाठी कोणतीही विशेष आर्थिक मदत, उद्योग, सिंचन, आरोग्य किंवा पायाभूत सुविधांबाबत ठोस घोषणा करण्यात आलेली नाही. शेतकरी हा देशाचा कणा असल्याच्या केवळ घोषणा केल्या जात आहेत; मात्र वास्तव असे आहे की दहा वर्षांपूर्वी शेतमालाला जो हमीभाव मिळत होता, तोच भाव आजही कायम आहे. उत्पादन खर्चात प्रचंड वाढ झाली असतानाही शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी कोणतीही ठोस योजना नाही. कर्जबाजारीपणा, पीक विम्याचे अपयश आणि नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना दिलासा देणारी तरतूदही या बजेटमध्ये आढळत नाही. हे बजेट म्हणजे सर्वसामान्य नागरिक, महिला, युवक व शेतकऱ्यांच्या तोंडचा घास काढून तो मोजक्या उद्योगपती व कॉर्पोरेट घराण्यांच्या ताटात वाढण्याचे षड्यंत्र आहे. मोठी-मोठी स्वप्ने दाखवून जनतेची दिशाभूल करण्याचा हा केवळ घोषणाप्रधान प्रयत्न आहे. आगामी राज्यांतील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काही निवडक राज्यांना खुश करण्यासाठी सादर करण्यात आलेले हे बजेट म्हणजे भाजप सरकारच्या जनविरोधी धोरणाचे स्पष्ट प्रतिबिंब आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय शैक्षणिक सहल

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**



**अर्जुनी/मोर :** गोंदिया जिल्हा पोलीस दलातर्फे राबविण्यात येत असलेल्या 'दादालोरा पोलीस खिडकी' योजनेच्या अनुषंगाने आदिवासी विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय मोफत शैक्षणिक सहलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. ही सहल मा. पोलीस अधीक्षक श्री. गोरख भामरे व मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. अभय डोंगरे यांच्या संकल्पनेतून, तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विवेक पाटील व केशोरी पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. मंगेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

सशस्त्र दूरक्षेत्र गोठणगाव, रोटरी क्लब ऑफ नागपूर साऊथ ईस्ट आणि शालिनीताई मेघे हॉस्पिटल, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी विकास हायस्कूल गोठणगाव येथील इयत्ता ५ वी ते १० वी मधील एकूण ५४ विद्यार्थ्यांना या सहलीचा लाभ देण्यात आला. पोलीस विभागाच्या वाहनाद्वारे विद्यार्थ्यांना नागपूर येथे पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सुरक्षितपणे नेण्यात आले.

नागपूर दौऱ्यात विद्यार्थ्यांनी महाराजा बाग, दीक्षाभूमी, गणेश टेकडी मंदिर व स्वामीनारायण मंदिर येथे भेट देऊन देवदर्शन केले. तसेच शालिनीताई मेघे हॉस्पिटल येथे सर्व विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. सहलीच्या दुसऱ्या दिवशी रोटरी क्लब ऑफ नागपूर साऊथ ईस्टचे पास्ट प्रेसिडेंट श्री. राजीव वरभे व विद्यमान प्रेसिडेंट श्री. गिरीश मेहता यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांना मेट्रो सफरीचा अनुभव देण्यात आला. गोठणगावसारख्या आदिवासी व दुर्गम, नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांनी प्रथमच मेट्रो रेल्वे पाहिल्याने त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह व आनंद ओसंडून वाहत होता. यानंतर रमण सायन्स सेंटर येथे भेट देऊन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा या उद्देशाने विविध शास्त्रीय प्रदर्शने दाखविण्यात आली. सदर सहलीचे यशस्वी नियोजन एओपी गोठणगावचे प्रभारी अधिकारी श्री. निळकंठ गित्ते यांच्या पुढाकाराने, तसेच प्रपोगंडा सेल गोंदियाचे भास्कर हरिणखेडे आणि जिल्हा पोलीस दलातील हवालदार भावते, थेर व मिसार यांच्या सहकार्याने करण्यात आले. ही सहल विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली असून, पोलीस प्रशासन व सामाजिक संस्थांच्या संयुक्त उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## गटर योजना व रेल्वे भिंतीचा मलबा रस्त्यावर

**गोंदिया :** शहरातील सुर्याटोला येथील रेल्वे लाईनजवळील गटर योजना व रेल्वे भिंती आवारभिंतीचा मलबा पडून आहे. यामुळे रस्ता अवरूध्द झाला असून वाहतूक करताना अडचणीचा सामना करावा लागत आहे. शिवाय रस्त्यावर मलबा येत असल्याने अपघातही वाढले आहेत. या प्रकाराकडे नगर परिषद प्रशासन व रेल्वे प्रशासन याकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आहे. परिणामी नागरिकांना जीव मुठीत ठेवून प्रवास करावा लागत आहे. याकडे स्थानिक जनप्रतिनिधीही डोळेझाक करीत असल्याने परिसरात समस्या वाढल्या आहेत.

सुर्याटोला परिसर अनेक समस्यांच्या विळख्यात सापडले आहेत. जनप्रतिनिधी व नगर परिषद प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने समस्या आणखीच वाढली आहे. या भागात गटार योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे काम होत आहे. परंतु, सदर काम नागरिकांच्या जीवावर उठले आहे. स्थानिक रहिवासी वंजारी यांच्या घरापासून बब्बाभाऊ (मच्छीवाले) यांच्या घरापर्यंत मागील पंधरवड्यापासून गटर योजनेचे काम व रेल्वे आवाराच्या भिंतीचा मलबा रस्त्यावर पडून आहे. या मलब्यामुळे घंटा गाडी, दुचाकी, चारचाकी तसेच इतर वाहनधारकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. अपघाताला खुले आमंत्रण देणारी ही परिस्थिती निर्माण झाली असतानाही संबंधित प्रशासन व तथाकथित जागरूक जनप्रतिनिधी मात्र डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. एखादी गंभीर दुर्घटना घडल्यावरच प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल परिसरातील नागरिक उपस्थित करत आहेत. तात्काळ मलबा हटवून रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत करावा, अन्यथा आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही नागरिकांकडून देण्यात आला आहे.

## राष्ट्र बनविण्याच्या दिशेने टाकलेले भक्कम पाऊल : आ. विनोद अग्रवाल

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**



**गोंदिया :** केंद्रीय वित्तमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी आज संसदेमध्ये सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा गोंदिया जिल्यासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत सकारात्मक व विकासाभिमुख आहे. हा अर्थसंकल्प 'कर्तव्य', 'रिफॉर्म', 'रफ्तार' आणि 'राहत' या तत्त्वांवर आधारित असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताला विकसित राष्ट्र बनविण्याच्या दिशेने टाकलेले भक्कम पाऊल आहे.

या अर्थसंकल्पात भांडवली खर्च वाढवून १२.२ लाख कोटी रुपये करण्यात आले असून, तो मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ९ﺰ अधिक आहे. यामुळे पायाभूत सुविधांच्या जलद विकासाला मोठी गती मिळणार असून, गोंदिया सारख्या ग्रामीण व आदिवासी बहुल भागांमध्ये रस्ते, रेल्वे आणि कनेक्टिव्हिटीमध्ये लक्षणीय सुधारणा होणार आहे. विशेष म्हणजे, मुंबई–पुणे, पुणे–हैदराबाद अशा महत्त्वाच्या मार्गांसह जाहीर करण्यात आलेले सात पर्यावरणपूरक हाय-स्पीड रेल कॉरिडॉर महाराष्ट्रासाठी वरदान ठरणार आहेत. यामुळे विदर्भासह गोंदियाला उत्तम कनेक्टिव्हिटी मिळेल, व्यापार-उद्योग वाढतील आणि स्थानिक तरुणांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतील. डांकुनी–सूरत डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरमुळे मालगाड्यांसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध होणार असून, रायपूर–गोंदिया–नागपूर दरम्यानच्या रेल्वे गाड्यांच्या उशिराला मोठ्या प्रमाणावर आळा बसेल. अर्थसंकल्पात मॅन्युफॅक्चरिंगला चालना देण्यासाठी सात धोरणात्मक क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे, ज्यामध्ये 'बायोफार्मा शक्ति' योजनेसाठी १० हजार कोटी रुपयांचे प्रावधान करण्यात आले आहे. आरोग्य क्षेत्रात भारताला जागतिक केंद्र बनविण्याच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण पायरी आहे. तसेच श्एई क्षेत्रासाठी नवीन फंड व 'कॉर्पोरेट मित्र' कॅडरमुळे लघु उद्योजकांना सक्षम पाठबळ मिळणार आहे. गोंदियातील वनाधारित उद्योग, कृषी-प्रक्रिया उद्योग आणि छोट्या कारखान्यांना याचा थेट लाभ होईल. शेतकऱ्यांसाठी ६ आधारित कृषी साधनांचा विस्तार, दुर्मिळ आजारांच्या औषधांवरील सवलत, सौरऊर्जा उत्पादनेवरील कमी शुल्क यामुळे सर्वसामान्य नागरिकांवरील आर्थिक भार कमी होणार आहे.

गोंदिया विधानसभा क्षेत्राचा प्रतिनिधी म्हणून मी या अर्थसंकल्पाचे मनापासून स्वागत करतो. हा अर्थसंकल्प केवळ आर्थिक विकासाला गती देणारा नाही, तर आपल्या आदिवासी बांधवांच्या, शेतकऱ्यांच्या, युवकांच्या आणि महिलांच्या कल्याणाला प्राधान्य देणारा आहे. महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने या अर्थसंकल्पातील योजना जमिनीवर जलद गतीने राबविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, ज्यामुळे गोंदिया जिल्हा समृद्धीच्या नव्या उंचीवर पोहोचेल.

## शिरपूर चेक पोस्टवर खासदाराची अवैध वसुली विरोधात धडक कारवाई



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**देवरी:** तालुक्यातील शिरपूर येथील चेक पोस्टवर सुरू असलेल्या कथित अवैध वसुली प्रकरणाने मोठी खळबळ उडवून दिली आहे. सोशल मीडियावर लाईव्ह ऑपरेशन करून या प्रकरणाची गंभीर दखल घेत खासदार प्रशांत पडोळे यांनी शिरपूर चेक पोस्टवर अचानक धडक देत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. या कारवाईमुळे संपूर्ण प्रशासनात खळबळ उडाली आहे. समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या चित्रफितीत चेक पोस्टवरील कर्मचारी आणि दलालांच्या माध्यमातून वाहनचालकांकडून बेकायदेशीररित्या पैसे उकळले जात असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. वाहनांना अडवून परिसरातील धाब्यांवर नेऊन तथाकथित 'वसुली ऑपरेशन टीम'द्वारे कार्डवरून मोठ्या प्रमाणात रक्कम वसूल केली जात असल्याचा गंभीर आरोप आहे.

खासदार प्रशांत पडोळे यांनी या प्रकारावर तीव्र संताप व्यक्त करत, 'सामान्य नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांची लूट सहन केली जाणार नाही. दलालांच्या माध्यमातून करोडो रुपयांचा गोरखधंदा सुरू असून, यामध्ये काही अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचा संशय आहे,' असे सांगितले. या प्रकरणात स्थानिक चौकशी अपुरी ठरणार असल्याने निष्पक्ष आणि सखोल तपासासाठी त्यांनी ष्ँ६ चौकशीची मागणी केली आहे. या अवैध वसुलीमुळे शासनाच्या यंत्रणेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, नागरिकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे. समाजमाध्यमांवर व्हायरल झालेल्या चित्रफितीमुळे प्रशासनाची प्रतिमा मलिन झाली असून, दोषींवर तात्काळ कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणात प्रशासन कोणती ठोस कारवाई करते, दोषींवर कायदेशीर कारवाई होते का, याकडे संपूर्ण तालुक्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.

## समतेचे विचार आजही प्रेरणादायी व मार्गदर्शक : डॉ. भारत लाडे

### संत रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**अर्जुनी-मोर :** समतेचे आद्य प्रसारक श्री संत रविदास महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाची सुरुवात श्री संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली.

भारतीय इतिहास व साहित्यात संत रविदास महाराज यांचे अनन्यसाधारण महत्त्व असून त्यांनी समाजात समता, सामाजिक न्याय व बंधुभावाचा संदेश दिला. समाजात जातीय तेढ निर्माण होऊ नये, माणसामाणसात भेदभाव नष्ट व्हावा आणि समतेची भावना रुजावी, यासाठी त्यांनी आपल्या विचारांतून मार्गदर्शन केले. संत रविदास महाराजांच्या विचारांमुळेच जगात समतेची नांदी नांदेल, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते डॉ. भारत लाडे यांनी केले. लक्ष्मी राईस मिल परिसरात आयोजित श्री संत रविदास महाराज जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना डॉ. भारत लाडे म्हणाले की, सोळाव्या शतकात जन्मलेल्या संत रविदास महाराजांनी मांडलेले समतेचे विचार आजही तितकेच प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत. त्यांच्या विचारांचा अवलंब केल्यास समाज अधिक सुसंस्कृत व सलोख्याचा बनेल. यावेळी संत रविदास बूट हाऊसचे संचालक फकीरा भसाखेत्री यांनी सांगितले की, गेल्या सहा वर्षांपासून भसाखेत्री परिवाराच्या वतीने श्री संत रविदास महाराज जयंती समारोहाचे आयोजन करण्यात येत आहे. या जयंती समारोहाच्या माध्यमातून समाज संघटित व्हावा तसेच संत रविदास महाराजांच्या विचारांचा प्रचार व प्रसार व्हावा, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास भोजराम रहेले (अध्यक्ष, लक्ष्मी राईस मिल), होमदास ब्राह्मणकर (कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य), सुरेंद्रकुमार ठवरे (पत्रकार), प्रमोद पाऊलझगडे, राठी सर, गहाणे सर, फकीरा भसाखेत्री, माया भसाखेत्री, चुमेश भसाखेत्री, जुसोफ डहाके, सुरज भसाखेत्री, सुनील सिंगणजुडे यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम शांततामय व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. यावेळी उपस्थितांनी संत रविदास महाराजांच्या समतेच्या विचारांचा अंगीकार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## कार्यशाळेत श्रीलंकेसह विविध राज्यातील अभ्यासकांची हजेरी

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**गोंदिया :** नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र गोंदिया अंतर्गत नवेगाव राष्ट्रीय उद्यान पर्यटन संकुलातील डारमेंट्री हॉल येथे १९ ते २३ जानेवारी दरम्यान ५ दिवसीय भारतातील स्लॉथ(आळसी) अस्वलावर राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेला श्रीलंका या देशातील अभ्यासकासह देशातील विविध राज्यातील अभ्यासकांनी हजेरी लावली होती. स्लॉथ बेअर संवर्धनावर विशेष भर देऊन वन्यजीव संशोधनातील प्रगतीवर ८ वे क्षेत्रीय आधारीत राष्ट्रीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेचे (प्रशिक्षण) उद्घाटन नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र, क्षेत्र संचालक पियुषा जगताप यांच्या हस्ते १९ जानेवारीला संपन्न झाले. प्रमुख पाहुणे म्हणून नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र साकोली उपसंचालक प्रीतमसिंग कोडापे, कार्यशाळेचे आयोजक विभागीय वनाधिकारी नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र विभागीय वनाधिकारी साकोली अतुल देवकर, प्रमुख मार्गदर्शक डॉ.निशीथ धारैया, प्रतीक देसाई, सखी दाभी उपस्थित होते. जगातील अस्वलाच्या एकूण प्रजाती भारतात आढळणारे, आपल्या परिसरात दिसुन येणारे स्लॉथ बेअर ची ओळख करून दिली. त्यांचे खाद्य, वर्तन वागणूक, त्यांच्या पासून बचाव कसा करायचा.एकूणच अस्वलापासून नागरीकांचे संरक्षण कसे करायचे,जेणेकरून मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी उपाययोजना करणे, तसेच वने व वन्यजीव याबाबत सविस्तर माहिती दिली. सदर कार्यशाळेला विदेशातील श्रीलंका येथुन विद्यार्थी, भारतातील उत्तरप्रदेश, उत्तराखंड, गुजरात, राजस्थान, दिल्ली, हरियाणा, उत्तरप्रदेश, उडिसा, कर्नाटक इ. राज्यातून विद्यार्थी हजर होते.

## श्रद्धा, आस्था व परंपरेचे प्रतीक असलेली कचारगढ यात्रा : अशोक नेते

### भाविकांना शुभेच्छा व विकासाबाबत मार्गदर्शन

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**सालेकसा :** माँ. काली कंकाली कुपार लिंगो महागोंगो कोयापूनेम महापूजेनिमित्त जनजाती चेतना समिती, जिल्हा गोंदिया यांच्या वतीने कचारगढ यात्रेचे आयोजन मोठ्या भक्तिभावात व उत्साहात करण्यात आले. या पवित्र यात्रेला माजी खासदार तथा भारतीय जनता पार्टी अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री मान. डॉ. अशोक नेते यांनी उपस्थित राहून भाविक भक्तांना शुभेच्छा दिल्या.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माँ. कंकाली कुपार लिंगो यांच्या आशीर्वादाने ही यात्रा मोठ्या आनंदोत्साहात साजरी होत असून, अनेक राज्यांतून आदिवासी बांधव व भाविक मोठ्या संख्येने कचारगढ येथे दाखल झाले आहेत. श्रद्धा, आस्था व परंपरेचे प्रतीक असलेली कचारगढ यात्रा ही आशिया खंडातील सर्वात मोठी गुफा असलेले पवित्र तीर्थस्थान असल्याचे मत यावेळी मा.खा. डॉ. अशोक नेते यांनी व्यक्त केले. जनजाती चेतना समितीच्या मार्गदर्शन कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले की, कचारगढ यात्रेच्या विकासासाठी आणि सुरक्षिततेसाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. माजी उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कचारगढ यात्रेच्या सर्वांगीण विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला असून, सातत्याने आढावा घेत यात्रेच्या विकासाच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घेतले जात आहेत. त्या विकासात्मक दृष्टीकोनातूनच आज कचारगढचा बदल दिसून येत आहे.



'मी स्वतःही या कचारगढ च्या विकासासाठी निधी दिला असून, दरवर्षी कचारगढ यात्रेला येत असतोय. कचारगढ यात्रेला येणाऱ्या सर्व भाविक भक्तांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो,' असे प्रतिपादन मा.खा. डॉ. नेते यांनी केले. या कार्यक्रमाला आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री अशोक उईके, देवरी-आमगावचे लोकप्रिय आमदार संजयजी पुराम, माजी आमदार डॉ. देवरावजी होळी, माजी जिल्हाध्यक्ष प्रशांतजी वाघरे, जि.प.सदस्य हनुमंत वट्टी, महामंत्री प्रकाश गेडाम, जिल्हा उपाध्यक्ष अरुण हरडे, सालेकसा तालुका अध्यक्ष देवराव चुटे, स्थानिक सरपंच ताई, जनजाती चेतना समितीचे अध्यक्ष नाजुक कुमरे, उपाध्यक्ष लोकनाथ तिथराम, कोषाध्यक्ष सुरेश भोयर, सदस्य सविता पुराम, नीलकंठ पुराम यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक उपस्थित होते. यावेळी आदिवासी समाजाची परंपरा, संस्कृती व ओळख टिकून राहावी यासाठी पारंपरिक नृत्य, कला सादरीकरण व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भक्ती, संस्कृती आणि एकतेचे दर्शन घडवणारी कचारगढ यात्रा यामुळे पुन्हा एकदा श्रद्धेचे केंद्र ठरली.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
सोमवार दि.०२ फेब्रुवारी २०२६

## जिल्हाधिकाऱ्यांनी टेकेपारच्या नागरिकांशी थेट संवाद साधला

**भंडारा :** सेवा पंधरवाडा २०२५ गावभेट माहिती उपक्रमांतर्गत तालुक्यातील मौजा टेकेपार पुनर्वसन पर्यायी गावठाण झबाडा येथे जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी भेट देवुन नागरीकांच्या अडीअडचणीबाबत थेट संवाद साधला.

तालुक्यातील टेकेपार पुनर्वसन गोसे प्रकल्पबाधित गाव असून गावातील नागरिकांच्या आरोग्य, शिक्षण, शुद्ध पाणी, पक्के रस्ते, शासकीय योजनाची अंमलबजावणी तसेच नागरी सुविधा इत्यादी समस्यावर चर्चा केली. पुनर्वसन समस्याचे लवकरात लवकर निराकरण करण्याचे सर्व विभागाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना निर्देश दिले.

यावेळी पुनर्वसन उपजिल्हाधिकारी पुजा पाटील, पंचायत समिती विस्तार अधिकारी प्रदीप लांजेवार, पंचायत विस्तार अधिकारी विवेक भगत, आरोग्य विस्तार अधिकारी मांढरे, जिल्हा परिषद भंडारा पंचायत विभागाचे ग्रामपंचायत अधिकारी सौरभ शेंडे, जिल्हा परिषद बांधकाम स्थापत्य अभियंता संदीप महाकाळकर, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अभियंता गाडे, तलाठी विठ्ठल मुंडे, ग्रामपंचायत सरपंच प्रियंका दिनेश कुंभलकर, उपसरपंच अंकोश पडोळे, सदस्य रवींद्र केवट, उषा शेंडे, रघुनाथ घरडे, पोलिस पाटील विभा वैद्य, आशा वर्कर दयावती मेश्राम, तंटामुक्ती अध्यक्ष केशव वंजारी इत्यादी उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# केंद्रीय अर्थसंकल्पावर जिल्ह्यातील मान्यवरांच्या प्रतिक्रीया

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी आज रविवार १ फेब्रुवारी रोजी संसदेच्या सभागृहात देशाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पावर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींसह सामाजिक कार्यकर्ते व विविध मान्यवरांनी साधक-बाधक प्रतिक्रीया व्यक्त केल्या आहेत. सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाचे काहींनी स्वागत केले असुन काहींनी नाराजी व्यक्त केली आहे.

### विकसित भारताकडे पाऊल टाकणारा अर्थसंकल्प - पालकमंत्री पंकज भोयर



केंद्रिय अर्थमंत्री निर्मलाजी सितारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प देशाला नवी उर्जा देणारा असून आत्मनिर्भर विकसित भारताची वाटचाल करणारा आहे. अर्थमंत्री सितारमण यांनी अर्थसंकल्पात सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. उद्योगांना चालना देण्यासाठी १० हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे.१० वर्षात २५ कोटी लोकांना गरीबीतून बाहेर काढण्याची तरतूद करण्यात आली. अपघात विमा वर आता टॅक्स रद्द करण्यात आला त्यामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळणार आहे. मंदिरांसाठी ५ हजार कोटीची तरतूद, महिलासाठी खास मार्टची उभारणी करण्यात येणार आहे. तथापि, महिलांना सक्षम होण्यास चालना मिळणार आहे.

शेतक-यासाठी एआय टूल तयार करण्यात येणार असून पशुपालनसाठी अनुदान,शेतक-यांचे उत्पादन वाढविण्यावर भर देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. शिक्षणासाठी ग्रामीण भागातून शहरात येणा-यां मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. देशाला बायो हब बनविण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

### अर्थसंकल्पात शहर व ग्रामीण विकासाचे प्रतिबिंब : आमदार डॉ. परिणय फुके



केंद्रीय अर्थमंत्री निर्मलाजी सीतारामन यांनी आज संसदेत सादर केलेला अर्थसंकल्प हा भविष्यातील भारताच्या बांधणीसाठी महत्वाचा ठरणार आहे. विशेष म्हणजे मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह बांधण्याची घोषणा मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारी आहे. महिलांसाठी स्वतंत्र मॉल तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांना उद्योग व रोजगारात संधी मिळणार आहे. शेतकऱ्यांसाठी त्यांचे उत्पन्न कसे वाढणार, याकडे लक्ष देण्यात आले आहे.

कृषी क्षेत्रासाठी विशेष पॅकेजची घोषणा करण्यात आली असून, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. प्राप्तिकरातील सवलत ही स्वागतार्ह बाब आहे. यामुळे सर्वसामान्यांच्या हातात खर्च करण्यासाठी पैसा राहील, ज्याचा थेट फायदा स्थानिक बाजारपेठेला आणि व्यापाराला होईल, कौशल्य विकासासाठी केलेली तरतूद ग्रामीण भागातील तरुणांसाठी संधी निर्माण करणारी आहे. सहकारी बँका आणि सोसायट्यांना बळकट करण्यासाठी घेतलेले निर्णय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करणार आहे. ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास आणि डिजिटल शेतीवर दिलेला भर भविष्यात नक्कीच फायदेशीर ठरणार आहे, असे आमदार डॉ. परिणय फुके यांनी नमूद केले.

### देशाच्या विकासाला गवसणी घालणारा अर्थसंकल्प : आ.नरेंद्र भोंडेकर



देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा सर्वांगीण विकासाचा झंझावात सुरू आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी आज मांडलेला अर्थसंकल्प विकासाला गवसणी घालणारा आहे. काही वस्तू महाग होने, काही वस्तू स्वस्त होने यावरून अर्थसंकल्पाचे मूल्यमापन होऊ शकत नाही. आपला देश जगातील तीसरी बळकट अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. त्याचे प्रतिबिंब आजच्या अर्थसंकल्पात दिसले अशी प्रतिक्रिया आ.नरेंद्र भोंडेकर यांनी दिली.

### सरकारच्या विकसित भारताबद्दल फक्त गोष्टी - खा. प्रशांत पडोळे



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज अर्थसंकल्प सादर केला, परंतु तो जनतेच्या अपेक्षांपेक्षा कमी पडला आहे. देशाला आशा होती की या अर्थसंकल्पातून मध्यमवर्गीय, बेरोजगार तरुण, शेतकरी आणि महागाईने त्रस्त असलेल्या लघु उद्योगांना दिलासा मिळेल, परंतु तसे काहीही दिसून आले नाही. सरकार विकसित भारताबद्दल बोलतं, पण या अर्थसंकल्पात सामान्य माणसाचे जीवन सुकर करण्यासाठी कोणतेही उपक्रम नव्हते. अर्थसंकल्प जाहीर झाल्यानंतर लगेचच शेअर बाजार कोसळला निफ्टी जवळजवळ ७०० अंकांनी आणि सेन्सेक्स जवळजवळ १,५०० अंकांनी घसरला. यावरून असे दिसून येते की बाजाराचा अर्थसंकल्पावर विश्वास नाही. महागाई सतत वाढत आहे. स्वयंपाकघरातील साहित्य, गॅस सिलिंडर, शिक्षण आणि वैद्यकीय सेवा या सर्व गोष्टी महाग होत आहेत, तरीही मध्यमवर्गाला कर सवलत देण्यात आलेली नाही. तरुणांसाठी नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी कोणतीही महत्त्वाकांक्षी योजना देखील नाही.या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना कर्जमाफीची आशा होती, परंतु सरकारने या मुद्द्यावर पूर्णपणे मौन बाळगले. आज शेती करणे आधीच कठीण आणि महाग झाले आहे. खते, बियाणे, कीटकनाशके, डिझेल आणि विजेचे दर सतत वाढत आहेत. या अर्थसंकल्पामुळे शेतीचा खर्च आणखी वाढेल, ज्यामुळे शेतकरी आणखी कर्जाच्या ओझ्याखाली दबून जातील.

### भविष्यातील स्वप्नं, आजच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष - आ.अभिजीत वंजारी



केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये मोठमोठ्या घोषणा करण्यात आल्या असल्या, तरी सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांना ठोस दिलासा मिळालेला दिसत नाही. महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि मध्यमवर्गावरील वाढता आर्थिक ताण याबाबत हा अर्थसंकल्प अपुरा ठरतो. पायाभूत सुविधा आणि हाय-स्पीड रेल्वेसारख्या प्रकल्पांच्या घोषणा आकर्षक वाटतात; मात्र ग्रामीण भाग, शेतकरी, लघु उद्योग आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी थेट लाभ देणाऱ्या तरतुदी अत्यंत मर्यादित आहेत. केवळ भविष्यातील स्वप्न दाखवण्यापेक्षा आजच्या वास्तव समस्यांवर उपाय अपेक्षित होते असे मत आ.अभिजीत वंजारी यांनी व्यक्त केले.

### आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नपूर्तीचा महत्त्वाचा टप्पा : सुनील मेंढे



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नपूर्तीचे स्पष्ट प्रतिबिंब आहे. मध्यमवर्गीयांच्या हिताचे संरक्षण करणाऱ्या या अर्थसंकल्पात युवक, बेरोजगार, शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिक यांचा सर्वांगीण विचार करून नियोजन करण्यात आलेले दिसते. आरोग्य व्यवस्था बळकट करणे, युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे तसेच पर्यटन क्षेत्राच्या विकासावर भर देणे ही या अर्थसंकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. भारताला मेडिकल टुरिझमचे केंद्र म्हणून विकसित करणे आणि औषधनिर्मितीचे जागतिक 'हब' म्हणून ओळख निर्माण करणे या बाबी विकसित भारताच्या संकल्पनेला पूरक ठरणाऱ्या आहेत.

यासोबतच देशात ७ नवीन रेल्वे कॉरिडॉरची घोषणा करण्यात आली असून, यामुळे दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे. या रेल्वे कॉरिडॉरमुळे प्रवाशांचा प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सोयीस्कर होईल. शेतकरी, व्यापारी आणि उद्योगांना मालवाहतूक सुलभ व कमी खर्चिक होणार असून ग्रामीण व शहरी भागांमधील आर्थिक दुवा अधिक मजबूत होईल. त्यामुळे रोजगारनिर्मितीला चालना मिळून सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून येईल. हा अर्थसंकल्प आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नपूर्तीकडे नेणारा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे मत माजी खासदार सुनील मेंढे यांनी व्यक्त केले आहे.

### भारताची वेगवान आर्थिक घोडदौड - आशु गोंडाने



केंद्र सरकारचा अर्थसंकल्प २०२६ संसदेत सादर करण्यात आला असून, देशाच्या आर्थिक दिशेला नवी दिशा देणाऱ्या अनेक महत्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपल्या भाषणात सामान्य जनता, मध्यमवर्ग, शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि उद्योजक यांच्यासाठी दिलासादायक घोषणा जाहीर केल्या आहेत. कररचनेत बदल, शिक्षण व आरोग्य क्षेत्रासाठी वाढीव तरतूद, रोजगारनिर्मितीला चालना देणाऱ्या योजना तसेच डिजिटल आणि पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला आहे . ह्या द्वारे विकसित भारत स्कल्पना पूर्ण करण्याच्या दुष्ठीने एक पाऊल पुढे होणार असल्याची प्रतिक्रिया भंडारा भाजप जिल्हाध्यक्ष आशु गोंडाने यांनी व्यक्त केली.

### देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारा अर्थसंकल्प - विनोद बांते



संसदेत सादर करण्यात आलेले अर्थसंकल्पीय विधेयक देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारे असून सर्वसामान्य नागरिकांच्या गरजांचा विचार करून तयार करण्यात आले आहे,अर्थसंकल्पीय विधेयकावर सखोल चर्चा होणे आवश्यक असून या विधेयकाचा परिणाम देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासावर होणार असल्याचे मत भंडारा जि.प.सदस्य तथा गटनेता विनोद बांते यांनी व्यक्त केले.

### सर्वसामान्यांच्या हिताचा अर्थसंकल्प - सचिन घनमारे



देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी लोकसभेत सादर केलेला अर्थसंकल्प हा विकसीत भारताच्या दृष्टीकोनातून खुप चांगला आहे. कॅन्सर व मधुमेह रुग्णांसाठी औषधी स्वस्त होणार असल्याने त्याचा मोठा फायदा रूग्णांना होणार आहे. हा अर्थसंकल्प सर्व सामान्यांच्या हिताचा असून, युवक, बेरोजगार, शेतकरी व महिलांना दिलासा देणारा आहे. नोकरदारांना सुध्दा याचा फायदा होणार असून, आत्मनिर्भर भारताला नव्याने गती देणारा वास्तववादी अर्थसंकल्प ठरणार असल्याचे मत भंडारा नगरसेवक तथा सभापती सचिन घनमारे यांनी व्यक्त केले आहे.

गोरगरिबांच्या मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून जिल्ह्याच्या ठिकाणी होस्टेल उभारण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. कापड उद्योगाला चालना, उद्योग क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक, गुंतवणूक करून मोठ्या प्रमाणावर रोजगाराची निर्मिती करण्याचा हा अर्थसंकल्प आहे. शेतीसोबत, शेती, पशुपालन, शेती पूरक व्यवसाय करण्याचा विशेष योजना अमलात येणार आहे. त्याचबरोबर महिलाना सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून बचत गटासाठी मोठी योजना या अर्थसंकल्पनात घेण्यात आली असल्याचे सचिन घनमारे यांनी सांगितले.

### विकसित भारताच्या संकल्पनेला दिशा देणारा अर्थसंकल्प : नितीन धकाते




केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी सादर केलेला सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत' या संकल्पांना नवी दिशा देणारा आहे. कर्तव्य भवनातून मांडलेला हा अर्थसंकल्प केवळ आर्थिक विकासाचा आराखडा नसून सामान्य जनतेच्या आकांक्षांची पूर्तता करणारा कर्तव्य दस्तऐवज आहे. कॅन्सर-मधुमेहाची औषधे स्वस्त करणे यांसारख्या निर्णयांतून सर्वसामान्यांचे आरोग्य आणि आर्थिक उन्नती यांचा विचार करण्यात आला आहे. १५ हजार शाळांमध्ये कंटेंट क्रिएटर लॅब आणि महात्मा गांधी ग्राम स्वराज योजनेच्या माध्यमातून शिक्षण आणि ग्रामीण विकासाचा नवा अध्याय सुरू होईल. शाळा, महाविद्यालयांमध्ये एआय शिक्षण दिल्यामुळे नवीन तंत्रज्ञान स्वीकारून नवीन पिढी घडविणे, मुलींच्या शिक्षणावर परत भर देण्यात आला असून प्रत्येक जिल्ह्यामध्ये मुलींसाठी वसतिगृह होणार आहे.सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास या सूत्राला धरून मांडलेला हा अर्थसंकल्प भारताला समृद्धीच्या शिखरावर नेणारा ठरेल, असा विश्वासही शिवसेना (शिंदे) पक्षाचे भंडारा शहर संघटक तथा माजी नगरसेवक नितीन धकाते यांनी व्यत केला.

### सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांची निराशा करणारा अर्थसंकल्प - चरण वाघमारे



अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प सर्वसामान्यांची आणि शेतकऱ्यांची निराशा करणारा आहे.कृषी क्षेत्रात उत्पादकता वाढवून चालणार नाही तर कृषी विद्यापीठाने शेतमालाला खर्च वजा जाता जे भाव सुचवले त्याच्या ४० टक्के भाव केंद्र सरकारने जाहीर केले हा शेतकऱ्यांवर मोठा अन्याय आहे.गुंतवणूक वाढवून बेरोजगारांच्या हाताला काम मिळणार असेल तर उपयोग होईल . प्रतेक वर्षी दोन कोटी लोकांना नोकऱ्या देण्याची आतापर्यंत अमलबजावणी झाली नाही. मधुमेहाची आणि कॅन्सरच्या दवाईच्या किंमती कमी करू अशी घोषणा केली पण आज ची स्थिती लक्षात घेतली तर योजनेतून कॅंसर या रोगावर उपचार होत असला तरी रुग्णांची मोठ्याप्रमतात लूट होत आहे याकडे सरकारचे दुर्लक्ष आहे , दुधाला भाव नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे जनावरे कत्तलखान्यात विकली जात आहेत, जी रामजी योजनेत ४० टक्के हिस्सा राज्य सरकारला भरायचा असल्याने मजुरांच्या हाताला ५० दिवसही काम मिळणार नाही .राज्य सरकारवर ऐवढे कर्ज असतानी ४० टक्के कुठून भरणार हा प्रश्न उपस्थित राहणार आहे .एकंदरीत शेतकरी शेतमजूर यांचेवर अन्याय करणार हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया माजी आमदार तथा राकाँ श.प.पक्षाचे जिल्हाध्यक्ष चरण वाघमारे यांनी दिली.

### भारत सरकारचा बजेट म्हणजे नुसता घोषणांचा पाऊस! मोहन पंचभाई



भारत सरकारच्या आजच्या अर्थसंकल्पात शेतकरी, कामगार , मध्यमवर्गीय व ग्रामीण विकासा संबंधाने कोणतेही धोरण नसलेला अर्थसंकल्प आहे. सरकारच्या सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रिय आरोग्य अभियान, जल जिवन मिशन करीता निधी नाही . महाराष्ट्र विषेशतः विदर्भ पुर्णतः वंचित आहे निर्यात धोरणात (भात) स्पष्ट धोरण नाहि फक्त निवडणुका पाहुन पश्चीम बंगाल सह काही राज्यात घोषणांचा पाऊस या अर्थसंकल्पातुन पाडण्यात आला असल्याची प्रतिक्रिया भंडारा जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष मोहन पंचभाई यांनी व्यक्त केली.

### भविष्याकडे बोट दाखवून वर्तमानावर पाणी फेरणारा अर्थसंकल्प - संजय रेहपाडे



सर्वच बाजूंनी निराशा जनक, दिशाहीन असलेला हा बजेट असून सामान्यासाठी, शेतकऱ्यांसाठी, बेरोजगार युवक युवतींसाठी रोजगार संदर्भात कुठल्याही संधी निर्माण करण्याच्या उपाययोजना नसून हाय स्पीड कॉरिडोर च्या घोषणा करताना मात्र सध्याच्या सुरू असलेल्या रेल्वेची सोयी व सुरक्षेच्या दृष्टीने असलेल्या स्थितीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. आयकर दात्यांसाठी सुद्धा या बजेट मधून निराशाच पदरी पडलेली आहे. भविष्याकडे बोट दाखवून वर्तमानावर पाणी फेरणारा हा बजेट असल्याची प्रतिक्रिया संजय रेहपाडे शिवसेना जिल्हाप्रमुख (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनी दिली.

### दीर्घकालीन विकासाला आधार देण्याचा प्रयत्न ! पंकज मुंदडा

भारताचा अर्थसंकल्प २०२६ हा समतोल आणि सावध असून, मोठे बदल करण्यापेक्षा चालू धोरणे पुढे नेण्यावर भर देतो. खर्चावर नियंत्रण ठेवत देशाच्या दीर्घकालीन विकासाला आधार देण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे

पंकज मुंदडा
सीए

# सेंदूरवाफात रात्री दिसला पुन्हा बिबट

■ वनविभाग घटनास्थळी ■ वनरक्षक चौकी लावा - राधेश्याम मुंगमोडे यांची मागणी

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**साकोली :** काही दिवसांपूर्वी १२ जाने. ला सायं. ०७:४५ दरम्यान सेंदूरवाफा प्रभाग क्र. २ व १ मध्ये बिबट्याचा मुक्त वावर जनतेने पाहीला. याने जनतेसह लहान मुलांना बाहेर निघण्यास मज्जाव करण्यात आला. यावर शिवसेनेचे राधेश्याम मुंगमोडे यांनी वनविभाग व नगरपरिषदेकडे जनतेच्या स्वाक्षऱ्यांसह बंदोबस्त करण्यासाठी निवेदन दिले होते. पण आता शनिवार ३१ जानेवारीला रात्री ०९:१५ दरम्यान शासकीय तंत्रनिकेतन अभियांत्रिकी समोरील प्रभाग क्र. २ मध्ये पुन्हा जनतेने बिबट्याला मुक्त संचार करतांना पाहीले आहे. यावर शनिवारी रात्रीच वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन कटरे यांनी तातडीने वनरक्षक दलास प्रभागात पाठवून गस्त वाढविली आहे. तर या पॉलीटेक्निक कॉलेज परीसरात वन्यजीव संरक्षण सुरक्षा चौकी उभारण्यात यावी अशी मागणी शिवसेनेचे राधेश्याम मुंगमोडे यांनी केली आहे.

यापुर्वी सेंदूरवाफा शहरातील प्रभाग क्र. २ व १ मधील नागरी वसाहतीत काही जनतेने बिबट्याला मुक्त संचार करतांना पाहीले व त्याची छायाचित्रे साकोली सोशल मिडीयातून व्हायरल केली. यावर वनविभाग चांगलेच अलर्ट झाले होते. आता शनिवार ३१ जानेवारीला शासकीय तंत्रनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालय परीसरात रात्री ०९:१५ ला पुन्हा बिबट्याचा मुक्त वावर जनतेने पाहीला. तातडीने वनपरिक्षेत्र अधिकारींनी वनरक्षक चमु तैनात केली.

हा परीसर गजबजलेली वस्ती असून रात्री १० पर्यंत लहान मुले शिकवणी वर्ग आणि महिला पुरुष जनता व्यापार मार्केटला जात असतात. या परीसरात वनविभागाने वनरक्षक चौकी उभारण्यात यावी. जेणेकरून गोंदिया जिल्ह्यातील माहुली या घटनेची पुनरावृत्ती साकोलीत होऊ नये. करीता या क्षेत्रात वनविभाग वनरक्षक चौकी, वन्यजीव प्राणी संरक्षण पिंजरा परीसरात तैनात ठेवण्यात यावे अशी मागणी शिवसेनेचे तालुकाप्रमुख राधेश्याम मुंगमोडे यांनी केली आहे.




### वन्यजीव संरक्षण नियमांचे पालन करा!

"यावर नगरपरिषद मुख्याधिकारी मंगेश वासेकर यांनी आवाहन केले की, रात्री लहान मुलांना बाहेर निघण्यास मज्जाव करा. पोलीस ठाणे निरीक्षक एम. पी. आचरेकर यांचे आवाहन की, जनतेने सतर्कता बाळगली पाहिजे. बालकांनी सायंकाळी पासून खेळायला जाऊ नये. वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन कटरे यांनी सांगितले की, वन्यप्राणींना सुरक्षित ठिकाणी वन्यजीव संरक्षण क्षेत्रात सोडण्यात येणार. शासन कायद्यानुसार वन्यप्राण्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक जनतेची जबाबदारी आहे. त्यांना कोणतीही इजा पोचवू नये. जनतेने अती सतर्कता बाळगली पाहिजे.

# धान-भरडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा

■ आमदार डॉ. परिणय फुके यांच्या पाठपुराव्याला यश ■ अन्न व नागरी पुरवठा विभागाचे कार्यवाहीचे निर्देश

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून हमीभाव केंद्रांवर धान व भरडधान्याची विक्री केलेल्या शेतकऱ्यांना अद्याप चुकारे मिळाले नव्हते. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. या गंभीर प्रश्नाची दखल घेत आमदार डॉ. परिणय फुके यांनी शासनस्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून अन्न व नागरी पुरवठा विभागाने संबंधित संस्थांना चुकारेबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.



पणन हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किंमत (टरढ) योजनेंतर्गत शासनाकडे धान व भरडधान्य विक्री केलेल्या शेतकऱ्यांच्या चुकारांबाबत निर्माण झालेला विलंब आता दूर होणार आहे. आमदार डॉ. परिणय फुके यांच्या ठोस व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांना मंगळवार, ३ फेब्रुवारी व बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत चुकारे अदा करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

शासनाच्या किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत धान्य विक्री करूनही चुकारे वेळेत न मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली होती. या विषयावर आमदार डॉ. परिणय फुके यांनी वित्त विभाग, संबंधित अभिकर्ता संस्था तसेच शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी समन्वय साधत शेतकऱ्यांची बाजू ठामपणे मांडली आणि हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली. त्यांच्या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद देत शासनस्तरावरून वित्त विभागाकडून प्राप्त होणारा निधी अभिकर्ता संस्थांना तात्काळ वितरित करण्याचे निर्देश वित्तीय सल्लागार व उपसचिव यांना देण्यात आले आहेत. तसेच अभिकर्ता संस्थांनी प्राप्त निधी क्षेत्रीय यंत्रणांमार्फत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात विहीत पद्धतीने जमा करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.यानुसार, ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत वित्तीय सल्लागार व उपसचिवांनी, तर ४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अभिकर्ता संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात चुकारे जमा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध : आ. डॉ. फुके

या निर्णयामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या धान व भरडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, शेतकरी हितासाठी सातत्याने लढणाऱ्या आमदार डॉ. परिणय फुके यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. शेतकऱ्यांच्या घामाला न्याय मिळवून देण्यासाठी आपण कायम कटिबद्ध असल्याचे आमदार डॉ. फुके यांनी यावेळी स्पष्ट केले.

### विष प्राशनाने एकाचा मृत्यू

युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी

**भंडारा :** लाखांदूर तालुक्यातील दहेगाव येथील कैलास उरकुडा गोंडाणे (५०) याने दि. ३० जानेवारी रोजी उंदिर मारण्याचे विषारी औषध प्राशन केल्याने त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

युवाराष्ट्र दर्शन/ता.प्रतिनिधी

**तुमसर २ फेब्रुवारी :** अश्लील फोटो व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पीडितेवर अत्याचार करणाऱ्या आरोपी विरुद्ध पोलिसानी विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करून ताब्यात घेतले आहे.

तालुक्यातील पीडित विवाहित अंदाजे वय ४५ वर्ष यांना अश्लील फोटो प्रसार माध्यमावर वायरल करण्याची धमकी देऊन तालुक्यातील एका नराधमाने तुमसर येथील नामांकित लॉजवर अनेकदा अत्याचार केले व पीडितेच्या पती,मुलांचा मोबाईल व्हाट्सअॅपवर फोटो,व्हिडीओ पाठवले तसेच मुलांना मारण्या ची धमकी दिल्याने पीडितेने सरळ तुमसर उपविभागीय अंतर्गत पोलीस ठाणे गाठून आपली आपबीती सांगितले.पोलिसांनी तात्काळ आरोपी विरुद्ध दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी कलम ६४(२)( ),३५१(२)भा.न्या.संहिता २०२३ सहवालम ६६(ई)६७(अ)माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अंतर्गत गुन्हा नोंद करून आरोपीला अटक केले आहे.

## नागपूर येथे माजी सैनिक मेळाव्याचे आयोजन

**वर्धा, :** सुरेश भट सभागृह, नागपूर येथे दि.८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता माजी सैनिक, वीर नारी आणि विधवांसाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यास सहभागी होण्यासाठी इच्छुक माजी सैनिक व त्यांच्या वारसांनी आपली नावे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

मेळाव्यात सहभागी होणाऱ्यांसाठी सैन्य मुख्यालयामार्फत वाहन, अल्पोहार व भोजनाची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. जे लाभार्थी स्वत:च्या गावाहून थेट मेळाव्यास जाणार आहेत. त्यांना बस तिकीट सादर केल्यानंतर प्रवासाचा खर्च दिला जाणार आहे. भोजनाचे योग्य नियोजन आणि निधीची तरतुद करण्यासाठी सहभागी होऊ इच्छिणाऱ्या माजी सैनिकांनी व त्यांच्या वारसांची तात्काळ नोंदणी करावी, असे उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्रीपती मोरे यांनी कळविले आहे.

# अजित पवार प्रत्येक क्षेत्रात दुरदृष्टी असलेले नेते होते - पालकमंत्री डॉ. भोयर

▫ जिल्हाधिकारी कार्यालयात अजितदादांना श्रद्धांजली ▫पालकमंत्र्यांसह अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती





■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०१**

अजित पवार हे प्रत्येक क्षेत्रात दुरदृष्टी असलेले नेते होते. त्यांच्या विकासात्मक कामाचा झपाटा व गती प्रचंड होती. त्यांच्या जाण्याने राज्याचा एक कणखर नेता, मार्गदर्शक हरवला आहे, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे गेल्या २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ विमान अपघातात निधन झाले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृह येथे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या उपस्थितीत अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यावेळी दादांविषयी आपल्या भावना व्यक्त करतांना पालकमंत्री डॉ.भोयर बोलत होते. यावेळी वर्धा नगरपरिषदेचे अध्यक्ष सुधीर पांगुळ, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, उपवनसंरक्षक हरविर सिंह, प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

सांगली जिल्ह्यातील एका साखर कारखान्याचा प्रश्न विधानसभेत उपस्थित होणार होता. त्यावेळी दादांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणाच्याही दबावाखाली न येता सभागृहात योग्य भूमिका घेण्याची सूचना केली होती. सेवाग्राम विकास आराखडा पूर्णत्वास गेला पाहिजे, अशी त्यांची भावना होती. सेवाग्राम सोलर अॅन्ड सायन्स पार्कचा प्रस्ताव मी दादांकडे मांडला होता. हा प्रस्ताव मंजूर करु असे दादा म्हणाले होते. त्यांच्या उपमुख्यमंत्री पदाच्या काळात हा प्रस्ताव पूर्ण होऊ शकला नाही याचे दु:ख आहे. मंत्रालयातील दादांच्या कक्षात बारामती येथे कृषि विज्ञान केद्रांची बैठक सुरु होती. बारामतीतील या केंद्रातील आधुनिक बाबी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाही पाहता याव्या यासाठी मी अजित पवार यांना विनंती केली होती. त्यांनी संबंधितांना सांगून तातडीने व्यवस्था करुन दिली. जिल्ह्यातील २६४ शेतकऱ्यांना बारामतीतील अत्याधुनिक कृषी विज्ञान केंद्र पाहता आले. त्याचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फायदा झाला. अजित पवार अतिशय दूरदृष्टीचे नेते होते. प्रत्येक क्षेत्राचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. अखेर घाईघाईने ते आपल्यातून निघून गेले. त्यांच्या जाण्याने समाजपयोगी काम करणारी व्यक्ती आपण गमावली आहे, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर पुढे बोलतांना म्हणाले.

यावेळी आपल्या भावना व्यक्त करतांना जिल्हाधिकारी वान्मथी सी म्हणाल्या, २०१९ पासुन दादांशी माझा परिचय होता. २०२२ मध्ये वित्त विभागात काम करत असतांना काही काळ त्यांच्या सोबत काम करण्याची संधी मिळाली. दादा आपले प्रशासकीय कामकाज अगदी सकाळपासुन सुरु करायचे. वर्धा येथे असतांना वेळेच्या आधीच ते जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले होते. दादा अगदी स्थानिक पातळीवरचे नेते होते. त्यांच्या जाण्याने राज्यातील प्रत्येकाचे नुकसान झाले असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण म्हणाले, २००७ पासुन दादांशी माझे संबंध होते. दादा त्यावेळी जसे होते तसेच आज देखील होते. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र विकसित होत होता. चांगले आणि गुणवत्ता पुर्वक कामे करण्याचा दादांचा कटाक्ष होता. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ म्हणाले, दादा जे बोलायचे ते करायचे. त्यांचे कार्य राज्यच नव्हे तर संपूर्ण देशाने पाहिले आहे. राज्याच्या जडणघडणीत, नव क्षितीज निर्माण करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. शासन, प्रशासनात त्यांच्या कामाचे प्रतिबिंब दिसून आले पाहिजे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली असेल. यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर व उपस्थिती सर्व मान्यवरांनी अजितदादांच्या फोटोला पुष्पमाला अर्पण करुन श्रध्दांजली वाहिली. सुरुवातीस दोन मिनीटे स्तब्ध्द राहून मौन पाळण्यात आले. श्रध्दांजली सभेस सर्व जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, संचलन नायब तहसिलदार अतुल रासपायले यांनी केले.

# राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांच्या अस्थी दर्शनाचा लाभ होणार वर्धेकरांना

**दि. २ रोजी ५ वाजता ते ३ रोजी २ वाजेपर्यंत होणार अस्थी दर्शन**



फाईल फोटो

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०१**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाल्याने त्यांचे वर्धेकरांना दर्शन होणार नसल्याने जिल्हयातील अजितदादांचे अनुयायी व प्रेमी त्यांच्या दर्शनाला मुकल्याने अस्थी दर्शन कलश अमरावती येथून आमदार संजय खोडके यांचे जनसंपर्क कार्यालय येथून प्रदेश संघटन सचिव राणा रणनवरे अस्थी कलश दि. २ रोजी दुपारी २ वाजता वर्धेला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार) शहर कार्यालय येथे दुपारी २ नंतर आणणार असल्याची माहिती शहराध्यक्ष निलेश खोंड यांनी दिली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा अस्थी कलश इंदिरा मार्केट, वंजारी चौक, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, शहर कार्यालयात दि. २ रोजी दुपारी ५ वाजता पोहोचणार असून दि. ३ च्या दुपारी २ वाजेपर्यंत अस्थी कलश दर्शनाकरिता उपलब्ध होणार त्यानंतर दुपारी २ नंतर पवनार येथील धाम नदी पात्रात अस्थींचे विधीवत विसर्जन करण्यात येणार असल्याने अजितदादांच्या अनुयायी व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सदस्यांसह जिल्हयातील नागरिकांनी अस्थी कलश दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रदेश संघटन सचिव राणा रणनवरे व अजितदादा मित्र प्रेमींनी केले आहे.

## विश्व हिंदू परिषद प्रखंडपदी पंकज देशपांडे



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट, दि. ०१**

विश्व हिंदू परिषद कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत संघटन बळकटीकरणाच्या दृष्टीने नियुक्ती जाहीर करण्यात आली यामध्ये नगर प्रखंड विश्व हिंदू परिषद अध्यक्ष म्हणून पंकज देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली.यावेळी विहिप वर्धा जिल्हा मंत्री शरद कोणप्रतिवार, विहिप वर्धा जिल्हा सहसेवा प्रमुख ओमप्रकाश मस्कर, विहिप हिंगणघाट प्रखंड अध्यक्ष सुरेंद्र आगरे, सरिता देशपांडे उपस्थित होत्या.

पंकज देशपांडे यांच्या झालेल्या नियुक्ती बद्दल विहिप विदर्भ प्रांत स्वावलंबी भारत प्रमुख अटल पांडे, अनुराधा महाकाळकर, सुरेश शरण शास्त्री, जिल्हा विहिप अध्यक्ष सुभाष राठी, अरविंद कोकाटे, संजय पोफळी, गजानन मसाये, अजय भोंग, अतुल देशपांडे, महेश राऊत, प्रशांत तिवारी, देवा वाघमारे, मारुती सहारे, दीपक शर्मा, संदीप नासरे, सुरज वरठी आदींनी आनंद व्यक्त केला.

## वाहनाची धडक ; वृद्धाचा मृत्यू

**वर्धा :** अज्ञात वाहनाच्या धडकेत एका वृद्धाचा मृत्यू झाला, ही घटना सेलसुरा परिसरात गुरुवारी रात्री घडली, राजेंद्र रामराव कदम (वय २८ रा. सेलसुरा) असे मृताचे नाव आहे, या प्रकरणी अक्षय राजेंद्र कदम यांनी सावंगी पोलिसात तक्रार दिली, त्यावरुन पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला, या प्रकरणी सावंगी पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

## निधन वार्ता

**श्रीधर उगले**

**पुलगाव,:** स्थानिक बडे ले-आऊट येथील रहिवासी गायक श्रीधर जानराव उगले वय(७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली असा आप्त परिवार आहे. त्यांच्या चार मुलींनी खांद्या दिला. स्थानिक पंचधारा मोक्षधामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## कापड साहित्य हातमाग महामंडळाकडून खरेदी करावे

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०१**

हातमागविणकरांनानियमितरोजगारउपलब्ध करुन देणे तसेच परंपरागत हातमाग व्यवसायाला चालनादेण्यासाठीमहाराष्ट्रराज्यहातमागमहामंडळ सुरु करण्यात आले आहे. महामंडळामार्फत तयार करण्यात येणाऱ्या कापड साहित्याची जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये, दवाखाने व वसतीगृहासाठी व विविध कार्यालयांनी खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

शासकीय व निमशासकीय कार्यालय, दवाखाने, वसतीगृह इत्यादी ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येतात. सत्कारमुर्ती तसेच मान्यवर पाहुण्यांना भेटवस्तु देण्यासाठी हातमाग महामंडळाकडे कापडी गुलदस्ते, करवती व पैठणी स्टोल, दुपट्टे, हिमरु शॉल, पैठणी साडी व पर्स उपलब्ध आहेत. कापडी गुलदस्त्यांमध्ये वापरण्यात आलेल्या कापड वस्तुंचा उपयोग दैनंदिन जीवनशैलीमध्ये करता येतो. सदर साहित्य महामंडळामडून खरेदी करावे जेणे करुन हातमाग पारंपरिक व्यवसायाला प्रोत्साहन मिळेल.

शासकीय, निमशासकीय कार्यालय, दवाखाने व वसतीगृहांनी राज्य शासनाच्या दि.१८ एप्रिल २०१८ च्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांना विदर्भ, मराठवाडा विभाग तसेच धुळे, नंदूरबार, जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र शासकीय पुरवठा करण्यासाठी ठरवून देण्यात आलेले आहे. तसेच हातमाग उद्योग टिकवून ठेवण्यासाठी केंद्र शासनाच्या वस्त्र मंत्रालयाच्या दि.३ सप्टेंबर २००८ च्या आदेशानुसार ११ प्रकारचे साहित्य आरक्षित ठेवलेले आहेत. यामध्ये बेडशिट, चादर, दरी, टॉवेल, कम्बल, ड्रेसमटेरियलचा समावेश आहे. सदर साहित्याचे उत्पादन हातमाग महामंडळ करीत आहे. उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना मुंबई यांच्या दरनिश्चितीबाबत शासन निर्णय १९ ऑक्टोबर २०२३ नुसार शासकीय पुरवठा करण्यासाठी मिळालेल्या मान्यतेच्या अधीन राहून शासकीय व निमशासकीय कार्यालये, दवाखाने वसतीगृह यांनी आवश्यक असलेले कापड साहित्य महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांच्याकडून खरेदी करण्यासाठी असे हातमाग महामंडळाच्या व्यवस्थापकांनी कळविले आहे.

# आष्टी ते कारंजा मार्गावर लावलेले रोपटे मरणासन्न अवस्थेत



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आष्टी(श), दि. ०१**

आष्टी ते कारंजा घा. या मार्गावर सिमेंट रस्त्याचे बांधकाम सुरु असल्यामुळे लहान रोपांना पाणी दिले नसल्याने लावलेली रोपे मारणासन्न अवस्थेत असून शेवटची घटका मोजत आहे. प्रशासकीय यंत्रणा मात्र या मार्गावर शोधून दिसत नसल्याने लहान रोपांना आता वाऱ्यावर सोडण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

### प्रशासनाचे दुर्लक्ष

आष्टी ते कारंजा (घा.)या मार्गावर गेल्या वर्षांपासून खोदकाम करून सपाटीकरण करण्यात आले. त्यावेळी सुरवातीला मोठमोठालीसागाची, बाभाळीची, इतर जातीची बहारदार वटवृक्ष तोडण्यात आली मात्र ती मोठी झाडें तोडल्यावर लहान रोपे लावण्यात आली नव्हती. गावाक-यांनी तक्रारी केल्यावर प्रशासणाला जाग आली तेव्हा कुठे रस्त्याच्या काठाणे लहान रोपे लावण्यात आली. रोपे लावली मात्र त्या रोपांना पाणी देण्यासाठी कुणीच पुढे आला नाही. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असल्याने रोपट्यांनी मान खाली टाकली. लहान रोपे पाणी नसल्याने मरणार आहे. या मार्गावर फेरफटका मारला असताना लहान रोपे काही मेली तर काही मात्र काड्या रूपात उभी असून शेवटची घटका मोजत आहे. एखादे मोठे झाड तोडायचे असेल तर त्या बदल्यात दहा झाडें लावायला पाहिजे असे शासकीय अधिकारी आवर्जून सांगतात. सिमेंट रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात असताना लहान रोपे मात्र दुर्लक्षित राहणार काय असा प्रश्न वृक्ष प्रेमिंना पडला आहे. या मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाचा कोणताही अधिकारी शोधून दिसत नसल्याने सिमेंट रस्ता बांधकाम करणाऱ्या कंत्राट दारानी मनमानी करून शासकीय व वन विभागाचे नियम धाब्यावर बसवून काम करण्याचा सपाटा सुरु आहे. लहान रोपांना जीवदान कोण देणार हे मात्र कोडे आहे.

> लहान रोपे लावल्यापासून त्या रोपांना पाणी न दिल्यामुळे रोपे मरणाच्या दारात आहे. आष्टी ते कारंजा (घा.)या रस्त्याच्या काठाणे लावलेल्या झाडांना पाणी दिले नाही.पाणी नसल्याने लहान रोपटे मरणासन्न अवस्थेत आहे.शासकीय यंत्रणा मात्र झोपेचे सोंग घेऊन आहे. दखल घेत नसेल तर आता आंदोलन करावे लागेल.
>
> **प्रशांत ठाकरे- माजी उपसरपंच बोटोणा**

# चाकू टॉमी फेकणाऱ्या टोळीला दिला सिनेस्टाईल चोप

**मदनी हेटीत ग्रामस्थांचा कहर**



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. ०१**

तालुक्यातील माळेगाव (ठेका) येथे शनिवारी पहाटे घडलेली घरफोडीची घटना काही तासांतच चोरट्यांसाठी काळ ठरली. तेरवीच्या कार्यक्रमासाठी घराबाहेर पडलेल्या कुटुंबाच्या घरावर डल्ला मारून दुचाकीवरून सुसाट पळ काढणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांना मदनी हेटी परिसरात ग्रामस्थांनी अक्षरशः सिने-स्टाईल पद्धतीने पकडून चांगलाच चोप दिला.

माळेगाव (ठेका) येथील दत्तू येवले हे कुटुंबियांसह बाहेर गेले असताना तीन जण सराईत गुन्हेगार त्यांच्या घरात शिरले. काही वेळातच चोरी करुन हे तिघे ट्रिपलसीट दुचाकीवरून सुकळी (बाई)च्या दिशेने पसार होत असल्याचे गावातील काही सजग नागरिकांच्या लक्षात आले. क्षणाचाही विलंब न करता मदनी येथील पोलिस पाटील योगेश खेळकर यांना माहिती देण्यात आली.यावेळी मदनी गावात अंत्यसंस्कार सुरू असल्याने मोठ्या संख्येने नागरिक एकत्र जमले होते. पोलिस पाटील खेळकर यांनी माहिती दिल्यानंतर ग्रामस्थांनी मदनी हेटी परिसरात रस्ता अडवून 'वेट अॅण्ड वॉच'ची आखणी करण्यात आली.

चोरट्यांनी रस्ता अडवलेला पाहताच पळ काढण्याचा शेवटचा प्रयत्न केला. दुचाकी थेट नागरिकांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न झाला. एवढ्यावरच न थांबता एका चोरट्याने सुदाम पवार यांच्यावर चाकू फेकून मारला, तर दुसऱ्याने पंकज घुमे यांच्यावर टॉमी फेकली. क्षणभर तणावाचे वातावरण निर्माण झाले; पण ग्रामस्थ मागे हटले नाहीत. एकीच्या जोरावर ग्रामस्थांनी तिघांनाही खाली पाडले. संताप अनावर झाला आणि चोरट्यांना चांगलाच चोप बसला. दरम्यान खरांगणा पोलिसांची चमू घटनास्थळी दाखल झाली. पोलिस उपनिरीक्षक दीपक सोळंकी यांच्यासह सहकाऱ्यांनी तिघांनाही ताब्यात घेत गुन्हा दाखल करून अटक केली.

**आरोपी सराईत गुन्हेगार**

अटक करण्यात आलेले रितीक विशाल नागदेवे (२६), अंकीत मधुकर ठाकरे (२४) व गौरव घनश्याम अंबादे (२०), सर्व रा. उत्तर नागपूर असून हे तिघेही सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पुढे आली आहे. नागपूर जिल्ह्यात यांच्यावर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# गाडगेबाबा मंडळाची सभा



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट, दि. ०१**

श्री गाडगेबाबा व्यायाम प्रसारक मंडळाच्यावतीने नगरपरिषद वाचनालय येथे मंडळाला ५० वर्ष पूर्ण झाले. या सुवर्ण महोत्सव वर्षात मंडळाकडून अखिल भारतीय सुवर्ण चषक कबड्डी स्पर्धा घेण्याकरिता सभेचे आयोजन करण्यात आले.

गाडगेबाबा व्यायाम प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजय बाकरे व मंडळाचे आजी माजी खेळाडू व पदाधिकारी यांच्या उपस्थित संत गाडगेबाबा व सती अनुसया माता यांच्या प्रतिमेचे पूजन करून व मंडळाचे दिवगत सदस्य श्याम पिसे, दुगरवार, नामदेव दुरबुडे, पांडुरंग तुळसकर, पांडुरंग उजवणे, यादवराव मुरकुटे, यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सभेचे संचालन वासुदेव भोयर यांनी केले असून प्रास्ताविक अशोक सोरटे यांनी केले.

सभेत विजय बाकरे, अॅड. सुधीर कोठारी, माजी आमदार राजू तिमांडे, डॉ.प्रकाश लाहोटी., हिम्मत चतुर, वासुदेव गौळकार, प्रकाश पाके भूषण पिसे, सुरेश सायंकार यांनी विचार सभेत व्यक्त केले. यशस्वितेकरिता रमेश जुवारे, विनोद भांडे, शेखर घुळघुळे, नानाजी नागमोते, विलास कळंबे, दिलीप गाठे, दशरथ ढोकपांडे, पप्पू अवस्थी, भादाडे, भाईमारे, आशिष जयस्वाल, श्रीकांत कोळसे डॉ. निर्मेश कोठारी, अनिल मडावी, मंगेश चवडे उपस्थित होते. आभार भूषण पिसे यांनी मानले.

